चरिम 9392 ५९
१०/४/६६

. ग्रं. सं. ठाणे
चरिम
9392



# मूर्तिकार कारेकर
यांचा
# ल्प परिचय

REFBK-0010321

लेखक
ना. रा. चिपळूणकर
बी. ए. [ऑनर्स]

मराठी ... ग्रं. संग्रहालय
अनुक्रम २०६५ ... 
क्रमांक ८८८ ...

मूर्तिकार

# कृष्णाजी बळवंत कारेकर

यांचा

# अल्प परिचय

१०३२१

— लेखक —

श्री. नारायण रा. चिपळूणकर,
बी. ए. (ऑनर्स)

— प्रस्तावना —

श्री. विनायक देवरूखकर (नाटककार), पुणे

REFBK-0010321

(मूल्य नये पैसे बासष्ट)

प्रकाशक :
नारायण रा. चिपळूणकर,
बी. ए. (ऑनर्स)
गांव भाग घर क्र. १००
सांगली

मूर्तिकार— कृ. ब. कारेकर
यांच्या एकसष्टी समारंभानिमित्त प्रकाशित होणारी पुस्तिका.

प्रसिद्धि दिनांक २४ नोव्हेंबर, सन १९५९.

[ सर्व हक्क लेखकाधीन ]

मुद्रक :
गोविंद वामन कुलकर्णी,
सेवा मुद्रणालय, १६७ बी,
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

स्थळप्रत
अनुक्रम
क्रमांक

प्रकाशक :
**नारायण रा. चिपळूणकर,**
बी. ए. (ऑनर्स)
गांव भाग घर क्र. १००
सांगली

मूर्तिकार– **कृ. ब. कारेकर**
यांच्या एकसष्टी समारंभानिमित्त प्रकाशित होणारी पुस्तिका.

प्रसिद्धि दिनांक २४ नोव्हेंबर, सन १९५९.

[ सर्व हक्क लेखकाधीन ]

मुद्रक :
**गोविंद वामन कुलकर्णी,**
सेवा मुद्रणालय, १६७ बी,
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

ज्यांच्या प्रेरणेनें, आशीर्वादानें
हें चरित्र रेखाटलें नि ज्यांनीं माझ्यावर निस्सीम प्रेम केलें,
त्या माझ्या श्वशुरांना—
कै. राजारामपंत बाळशेट कारेकर यांना—
सादर समर्पण

—लेखक

# लेखकाचे दोन शब्द—

" ज्यांच्या चरित्रांत मोठाल्या घटना वा मोठाले पराक्रम नाहींत त्यांचें चरित्र लिहावें कशाला ? " अशी कृपण शंका अनेकांच्या मनांत डोकावते नि त्यामुळें सामान्य वर्गांतील कर्तबगार माणसें 'अपरिचित' ठेवलीं जातात. नररत्नांचें आकर्षण सर्वांनाच असतें; पण " असें कांहीं आपल्याला होतां येणार नाहीं " अशी भावनाहि सर्वत्र आढळते. उलटपक्षीं सामान्यांतील कर्तबगार माणसांचा परिचयच मार्गदर्शक ठरतो.

मूर्तिकार कृष्णाजी बळवंत कारेकर यांचा अल्प परिचय करून देतांना एक आवश्यक कर्तव्य पूर्ण करीत असल्याची जाणीव मला होत आहे. कृष्णाजीपंतांचे थोरले बंधु राजारामपंत यांचेकडून मला बरीचशी माहिती उपलब्ध झाली होती. त्यांनीं सांगितलेंहि होतें कीं " काकांचे संबंधानें कांहींतरी लिहा. लिहिण्याजोग्या बऱ्याचशा गोष्टी त्यांच्या आयुष्यांत आहेत."—तो योग आतां येत आहे—नि तोहि कृष्णाजीपंतांच्या षष्ठ्यब्दी-पूर्तीच्या वेळीं. या वेळीं राजारामपंत हयात असते तर त्यांना विशेष आनंद झाला असता. पण सगळ्याच गोष्टी कशा मनासारख्या जमावयाच्या !

लेखनाचा माझा व्यवसाय नाहीं. त्यामुळें लेखनांत चुका असतील, मांडणीहि तितकीशी व्यवस्थित नसेल नि आणखीहि कांहीं कमतरता आढळेल; पण कर्तव्यबुद्धीनें केलेली ही सेवा गोड मानून घ्यावी ही विनंति.

माहिती मिळविण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचा हातभार जिनें लावला त्या माझ्या पत्नीचा—सौ. सिंधूचा—उल्लेख येथें करणें आवश्यक आहे.

वेळांत वेळ काढून बहुमोल अशी प्रस्तावना या छोट्या पुस्तकास देऊन विनायकराव देवरूखकरांनीं मला उपकृत करून ठेवलें आहे.

पुस्तक छपाईचें काम सुंदर रीतीनें करून दिल्याबद्दल सेवा मुद्रणालयाचे मालक व आंतील ब्लॉक प्रिंटिंगचें काम सुबक केल्याबद्दल सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेसचे मालक यांचे मानावेत तेवढे आभार थोडेच आहेत, तसेंच आर. टी. उपासनी यांनीं वेळेवर ब्लॉक करून दिले याबद्दल त्यांचेहि आभार मानावयास हवेत.

ज्यांच्या प्रेरणेनें नि आशिर्वादानें ही 'कामगिरी' मी करूं शकलों त्या कै० ती. दादांना-राजारामपंत बाळशेट कारेकर यांना-सादर अभिवादन करून हे दोन शब्द पुरे करतो.

—लेखक

# पित्याच्या अंतःकरणांतून माझा पडसाद —

‘ माझं जीवन बुवा अगदीं सरळ नि साधें आहे. असं म्हणणाऱ्या व्यक्ती मीं खूप पाहिल्या आहेत. त्या साऱ्या व्यक्तींचें मला आश्चर्य वाटतें. त्यांचें जीवन सरळ नि साधें म्हणजे काय ? असा मी त्यांना प्रश्न विचारतों. ‘ जीवन ’ जर अगदीं सरळ वाहात गेलें तर त्याला जीवन हें नांव सार्थच ठरत नाहीं, असें माझें ठाम मत आहे.

जीवनांत खळखळाट हवा. तें उथळपणें वाहात राहिलें पाहिजे. अगदीं संथ, गंभीर आणि मंद मंद वाहणाऱ्या जीवनाला ‘जीवन’ कां म्हणायचें ?

माझ्या यां तत्त्वाप्रमाणें आयुष्याच्या सरितेंत मी थोडा बहुत उथळपणें वाहलों आहें. पण या उथळपणाचा ‘ प्रमादपूर्ण जीवन ’ असा अर्थ करून घेऊं नये.

सुखदुःखांच्या घटनांवर माझ्या जीवन-सरितेचा प्रवाह वेळोवेळीं आदळलेला आहे. आणि त्याशीं झुंज खेळून नव्या मार्गानें पुढें पुढें वाहण्यासाठीं वळण घेऊन धांवला आहे. ज्या प्रत्येक झुंजीच्या वेळीं माझ्या जीवनसरितेचें पाणी या खडकांवर आदळलें आहे त्या वेळीं त्याचे छानदार तुषार उंच उंच उडाले आहेत. खळखळाट निर्माण झाला आहे. जीवन–सरिता उथळ बनली आहे आणि आंतला तळ स्वच्छ नि स्पष्ट दिसला आहे.

या जीवनसरितेंत कोणाचीहि नौका मीं आजवर तळीं घातलेली नाहीं. वादळाच्या वेळीं त्यांना “ पोटांत ” घेण्याऐवजीं मीं त्यांना लाटारूपी हातांच्या बाहूंतच घेतलें आहे. त्यांचें संरक्षण केलें आहे. आणि वादळ शांत झाल्यावर त्या जीवननौकांना मीं पुनः त्यांच्या मार्गानेंच वाहूं दिलें आहे.

मीं कुठं जन्मलों, कसा जन्मलों, केव्हां जन्मलों आणि मीं जन्मल्यानंतर काय काय प्रताप केले तें सगळेंच किंवा त्यांतील थोडेंसें तरी सांगण्यासारखे आहेच असें नाहीं. मीं माझं आयुष्य खरोखरींच साधेंभोळेंपणानें, निष्कपट मनानें आणि सद्वर्तनानें व्यतीत केलें कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार मी सर्वस्वीं तुमच्याकडे सोंपवितों.

आतां आयुष्याची वाटचाल सतत सांठ वर्षें चालली आहे. साहजिकच थोडा थकलों आहें. थोडी विश्रांति घ्यावी म्हणतों. थोडंसं आयुष्य ईश्वरचरणीं अर्पावं म्हणतों. घोडदौड आहेच कीं नेहमींची !

दुसरी गोष्ट म्हणजे या विश्रांतीच्या वेळीं गतआयुष्याकडे थोडेंसें वळून पाहाणार आहें. थोडेंसें सिंहावलोकन करणार आहें. झाल्या आणि केल्या गोष्टींचा चित्रपट पाहाणार आहें. स्मृतीचें पुस्तक चाळत राहाणार आहे. या स्मृतीचें पुस्तक साठ वर्षांचें जुनें आहे. अर्थातच तें तितकेंसें नीट नाहीं. त्यांतलीं जीं पानें फारच जीर्ण झालीं असतील तीं गळून पडलेलीं आढळणार आहेत. जीं अजून हरवायचींच तेवढीं बाकी राहिलीं असतील, त्यावरचीं चित्रें पुसट पुसट दिसणार आहेत. त्यावरचीं अक्षरें नीट उमगणार देखील नाहींत. शिवाय पुस्तकाची बांधणीहि लेचीपेची असल्यानें त्यांतून निसटलेलीं पानें कुठंतरी अर्धेमर्धेच खोंचून ठेवल्यानें अयोग्य सन-पान-क्रमांकावर आढळणार आहेत.

कुठंहि असो, कांहींहि असो, कसेंहि असो हा चित्रपट पाहाण्याची मला उत्कंठा लागून राहिली आहे. तेव्हां आपण तिकडेच वळूं.

कृष्णहृदय
( विजयकुमार कारेकर. )

# प्रस्तावना

## मूर्तिकार काकाजी —

परिस्थिति माणसाला घडवीत असते तर कधीं माणूस परिस्थिति घडवीत असतो. ओबडधोबड दिसणाऱ्या पाषाणांतून देवाची सुंदर मूर्ति निर्माण करण्याची किमया कलावंताच्या कौशल्यांत असते. परिस्थितीवर मात करण्यांत माणसाचा पराक्रम कारणीभूत होतो आणि मग सामान्याचें असामान्यत्व समाजाला प्रतीत होतें. या विचारसूत्रांतच आमचे काकाजी यांच्या जीवनाचें सार सामावलेलें आहे असें दिसून येईल.

थोर व्यक्तीचें चरित्र लिहिलें जातें. हें जरी सत्य असलें तरी सर्व-साधारणपणें जीवन घालविणाऱ्या व्यक्तीच्या जीवनांतहि 'थोर' प्रसंग आलेले असतात, तर कधीं घोर प्रसंगांनींहि आघात केलेले असतात. संकटांशीं यशस्वी झुंज देऊन, मिळणाऱ्या संधींतील प्रत्येक क्षणाचा योग्य फायदा घेऊन जी व्यक्ति स्वतःच्या जीवनाला सुंदर आकार देते त्या व्यक्तीचें चरित्र लिहावयास योग्य आहे असें माझें प्रामाणिक मत आहे.

आत्मचरित्र लिहीत असतांना स्वतः लेखकाचें मन संकोचानें आकसून जातें. त्यांतून शिक्षणाचे दृष्टीनें विचार केला तर "काकाजी" यांना माघार घ्यावी लागेल. पण त्यांनीं कलेची एकनिष्ठेनें सेवा केली, आचारविचारांत विशाल दृष्टिकोन ठेवला, परमेश्वराची निष्ठा लवमात्र ढळूं दिली नाहीं, परदेशांत संचार करींत असतांना मद्य आणि मांसाहार यापासून ते अलिप्त राहिले, कुठल्याहि बिकट परिस्थितींत मनाचा सम-तोलपणा सोडला नाहीं आणि आत्यंतिक आनंदाच्या प्रसंगीं मनाला दंभ शिवूं दिला नाहीं, तसेंच स्वतःचें वर्तन निर्मळ ठेवलें. अशा काकाजींचें

चरित्र केवळ त्यांच्या कुटुंबालाच नव्हे तर समाजाला मार्गदर्शक होईल असा विश्वास वाटतो.

श्री. चिपळूणकर यांनीं "काकाजीं"च्या चरित्राची लिहिलेली हस्तलिखित प्रत मी वाचली. त्यांनीं चरित्राची मांडणी आटोपशीर केली असून त्यांची भाषा सोपी आणि रसाळ आहे. चरित्र लिहीत असतांना लेखकाचा "काकाजी" यांचेविषयीं असणारा आदर आणि निष्ठा ठायीं ठायीं व्यक्त होत आहे.

काकाजींचे चरित्रांत एक वैशिष्टय आढळून येतें. मूर्तिकार या नात्यानें त्यांनीं अनेक संस्थानिक व जहागीरदार यांना सोन्याचांदीच्या मूर्ति तयार करून दिल्यामुळें त्यांचेशीं निगडित संबंध आला. त्यांच्या सांनिध्यांत सतत राहावयास मिळाल्यामुळें संस्थानिकांचे रीतिरिवाज, आचारविचार, दरबारी शिष्टाचार अगदीं जवळून पाहावयास मिळाले. एवढेंच नव्हे तर काकाजींनीं आपल्या नम्र व प्रेमळ वर्तनानें त्यांचे बरोबर कायमचे स्नेहसंबंध जोडले. त्यामुळें काकाजींच्या चरित्रांत जमखिंडीकर, बावडेकर मिरजकर, सरदार रास्ते या संस्थानिकांच्या व्यक्तींचेहि परिचय घडून आले.

हें चरित्र जास्त विस्तृत लिहिलें गेलें असतें तर या संस्थानिकांच्या इतिहासाचें मोठ्या प्रमाणावर समालोचन करतां आलें असतें. तरीपण आवश्यक तेवढा भाग चरित्र लेखकानें घेतला आहेच. सरळवृत्ति, नम्रपणा, कामाची चिकाटी व जबाबदारीनें काम करण्याची हातोटी एवंगुण वैशिष्टयानें काकाजींनीं जीवनांत अतिशय मोठें यश मिळविलें. गगन-बावड्याच्या धुळींत खेळणाऱ्या मुलानें युरोपचा प्रवास केला आणि त्यांचे चिरंजीव शांतारामबापू यांच्या बुद्धिमत्तेला उत्तेजन मिळाल्यामुळें त्यांना परदेशीं जाऊन अभ्यास करण्याची सुवर्ण संधी मिळाली, हीं केलेल्या कष्टाचीं फळें आहेत.

खऱ्या कलावंताचें मन नेहमीं अस्वस्थ असतें. कारण शोधक मन त्यास स्वस्थ बसूं देत नाहीं. काकाजींची मनोधारणा अशीच आहे. त्यामुळें त्यांनीं उत्तमोत्तम मूर्ति तयार करून आपल्या लौकिकांत वाढत्या श्रेणीनें भर घातली. त्यांची कला म्हणजे त्यांची चिरंतन कीर्ति आहे. त्यांचें हें कलावैभव सर्वत्र विखुरलेलें आहे.

त्यांच्या चरित्रावरून एक दिसून येतें कीं, त्यांनीं परिस्थिति घडविली. म्हणजे ते केवळ सोन्याचांदीचे मूर्तिकार राहिले नाहींत, तर त्यांनीं परिस्थितीलाहि आकार दिला; म्हणजे ते काळाचे देखील मूर्तिकार झाले. हें चरित्र एका साध्या कुटुंबांतील साध्या माणसाचें आहे. त्या साधेपणांत सोज्वळता आणि कार्यतत्परता आहे म्हणून त्यांच्या चरित्राला महत्त्व प्राप्त झालें आहे.

काकाजींच्या एकसष्ठाव्या वाढदिवसाच्या निमित्तानें हें चरित्र प्रसिद्ध होत आहे. त्यांना "एका शतकाचें" दीर्घायुरारोग्य लाभावें अशी मी परमेश्वरचरणीं प्रार्थना करतों.

दि. २४।११।५९. —विनायक देवरुखकर.

# मूर्तिकार कृष्णराव बळवंतराव कारेकर

## यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तिनिमित्त

## ~: अभीष्ट चिंतन :~

जग सदैव देई मान मूर्तिकारांना
मग कां न मिळावा **मान कृष्णरावांना**

तद्हातीं किमया देवा घडवायाची
ज्यापुढें मस्तकें नमती अमुचीं-तुमचीं

वदतात निर्मिले देवें मानव सारे
इथें निर्मी देवा मानव, अजबचि न्यारें !

किति देवमूर्ति त्या प्रथित भारतीं यांच्या
किति सुवर्ण-चांदी-चंदन-गजदंतांच्या

किति राम-लक्ष्मण-सीता-मारुति यांच्या
किति गजाननाच्या, किति पंचायतनांच्या

किति जहागिरी या कलाकृतींना साक्ष
बावडा-मिरज-जमखंडि औंध प्रत्यक्ष

कां कलाकृति अशा आश्रयाविना जगती ?
परि आश्रयदाते महाभाग किती जगतीं ?

जाहलीं वया यांचिया साठ हीं वर्षें
या शतायु प्रार्थी **वासुदेवसुत** हर्षें !

कोल्हापूर

वासुदेवसुत कारेकर



मूर्तिकार—कृष्णाजी बळवंत कारेकर

# बाराखडींतलं मखर—

दहा बारा वर्षांच्या बालकाचें काम ऐन रंगांत आलें होतें. काम सर्वांगसुंदर व्हावें, शोभिवंत व्हावें या जिद्दीनें तो खपत होता, रमत होता. श्रीरामचंद्राच्या देवालयासमोर मखर तयार करण्याचें काम चालं होतें. श्रीरामजन्माचा उत्सव सगळीकडेच मोठ्या प्रमाणांत साजरा होतो. पण गगनबावड्यांतील या उत्सवाची रंगत कांहीं आगळीच होती. जहागिरदारांचें कुलदैवत आणि तो उत्सव धुमधडाक्यानें पार पाडण्याची पूर्वपरंपरा! हजारों लोक जमावयाचे, पंक्तीवर पंक्ती उठावयाच्या नि त्याहि सुग्रास भोजनाच्या. तळकोंकणांतील नि आसमंतांतील लोकांच्या पूर्ण परिचयाचा हा दिवस !

बालक आपल्या कामांत पूर्ण एकरूप झाला होता. कशाकडे नजर नाहीं, कोणी आलें तरी तिकडे लक्ष नाहीं—एकच ध्यास, कामाच्या पूर्ततेचा ! नि तोहि कलात्मकरितीनें पूर्ण करण्याचा. अवघड असें कलात्मक काम, अनभिज्ञ अशा बाल कलाकाराकडे सोपविणाऱ्या धन्याच्या धाडसाचें अभिनंदन करावयाचें कीं न पेलणारें काम यशस्वीं करून दाखविण्याची जिद्द बाळगणाऱ्या बालकाचें कौतुक करावयाचें ?

अशा वेळीं अचानकपणें एक बगी तेथें येते. उमदे घोडे, एटबाज बगी—साहजिकच कोणी बडी असामी आलेली. आजुबाजूचे लोक चटकन् बाजूला झाले. धीर गंभीर चेहऱ्याची वयस्क पण सतेज व्यक्ति बाहेर आली. झालेल्या कामाचें अवलोकन केलें. चेहऱ्यावरच्या हास्यानें काम पसंत पडल्याची ग्वाही दिली. बालकाच्या पाठीवर प्रेमाची थाप पडली.

बालक भानावर आला. मागें वळून पाहिलें तो जहागिरदारसाहेबांची स्वारी. चटकन लवून नमस्कार केला. कौतुक झालें. प्रशंसा केली गेली.

योग्य त्या सूचनाहि दिल्या गेल्या. कोल्हापूर जिल्ह्यांतील एका टोंकास असलेल्या गगनबावडा गांवांतील हा प्रसंग.

ठरल्याप्रमाणें मखराचें काम पूर्ण झालें. जमलेल्या हजारों लोकांनीं मुक्तकंठानें तारीफ केली त्या कामाची ! बाल कलाकाराचें सगळीकडे खूप कौतुक केलें गेलें. यथोचित सत्कार झाला. बालकाच्या कलेचें पहिलें पण अति सुंदर स्वागत झालें.

या बालकास चित्रें काढण्याचा पहिल्यापासूनच नाद. बळवंतराव कारेकरांना वाटायचें आपल्या 'कृष्णा 'नें खूप शिकावें, चांगलीशी नोकरी मिळवावी. पण कृष्णाचें मन शालेय जीवनांत रमणारें नव्हतें. खूप हिंडून सौंदर्यस्थळें शोधण्यास आसावलेलें मन 'बाराखड्या' सारख्या शुष्क कामांत गुंतेल कसें ? गुंतविलें गेलें तरी रमेल कसें ? भव्य मूर्ति तयार करण्याची उमेद बाळगणारें मन शालेय जीवनाशीं समरस होणेंच अशक्य. बळवंतरावांनीं जाणलें कीं आपला 'कृष्णा' कारकून होण्याकरितां जन्माला आला नसून हा एक ख्यातनाम मूर्तिकार होणार आहे.

★ ★

संग्रहालय
क्र. १०३२१

# गगनबावड्याच्या घाटांतून—

तसें कारेकर घराणें मूळ गोव्यांतील. त्यांचें कुलदैवत 'रवळनाथ' गोव्यांतीलच. गोव्यावर सत्ता पोर्तुगीजांची. धर्मवेडानं पछाडलेले हे लोक. दुसऱ्या धर्मांतील लोकांना आपल्या धर्मांत ओढायचें नि तेंहि भल्याबुऱ्या-मार्गांनें. 'चुकलेल्या मेंढरांना आपल्या कळपांत ओढून घेण्यासाठींच आपला कार्यभाग आहे या भावनेनें हे लोक पछाडलेले.' अशा परिस्थितींत एकादा अधिकारी उन्मत्त व्हावयाचा नि अन्यधर्मीयांची ससेहोलपट करावयाची. खालील १५६० सालीं काढण्यांत आलेलें फर्मानच याची खात्री पटवितें.

> "आपली चीजवस्तू व स्थावर मिळकत विकून एका महिन्याच्या अवधींत ब्राह्मणांनीं व सुवर्णकारागिरांनीं गोवा सोडावा. नसल्यास आजन्म गुलामगिरी व मिळकतीची जप्ती ही शिक्षा देण्यांत येईल."

सहनशीलतेलाहि कांहीं मर्यादा असतेच. एक धर्म तरी सोडावा वा स्थलत्याग तरी करावा असा सवाल कांहीं वेळा उभा राहावयाचा. या सवालास जबाब म्हणून कांहीं कुटुंबें मजल दरमजल करीत गोव्यास रामराम ठोकून भारतांत आलीं.

अशापैकीं एक कुटुंब रत्नागिरी जिल्ह्यालगतच्या तळकोकणांत प्रवेश करतें झालें. तिथवली गांव त्यांना बरा दिसला. लोकहि प्रेमळ दिसले. वातावरणहि जुळतें वाटलें, झालें, हें कारेकर कुटुंब तिथवली गांवचे रहिवासी झालें.

या कुटुंबांतील सर्वांनाच कष्टाची आवड होती. प्रामाणिकपणा हा त्यांचा स्थायी भाव होता. नेकीनें राहावयाचें, गुण्यागोविंदानें राहावयाचें हे त्यांचे धोरण. आपलेपणाचा आदर्श त्यांनीं निर्माण केला. साहजिकच

तिथवलींतील प्रमुख मंडळींत त्यांची गणना व्हावयास फारसा वेळ लागला नाहीं.

अगोदर रत्नागिरी जिल्हा, गरीब महाराष्ट्रांतील दरिद्री जिल्हा. त्यांत तळकोंकणचें दैन्य कांहीं विचारावयास नको. निकृष्टप्रतीची जमीन, ना दळणवळणाची साधनें ना व्यापार ! लक्ष्मीदेवीच्या अवकृपेचा भरपूर वांटा या प्रदेशास मिळालेला. अशा परिस्थितींत हातातोंडाची मिळवणी करतां करतां जिकीर व्हावयाची. मग भरभराटीचें नांव तरी कसें निघायचें ? नि निघून उपयोग तरी काय ? पूर्वपरंपरागत सोनार कामांचा व्यवसाय नीट करावयाचा म्हटला तरी त्याचा जम कसा बसायचा ? कुटुंबांतील परिस्थिति एकंदरींत ओढाताणीचीच असावयाची.

अशाहि परिस्थितींत चार दोन पिढ्या कालक्रमणा करत्या झाल्या. कोणा एकाद्या हुशार माणसाच्या डोक्यांत उर्जितावस्थेचा विचारहि यावयाचा. कांहींना कांहीं मार्गही सुचावयाचे, पण परिस्थितीला कलाटणी देण्याचें जमलें नाहीं कुणाला !

या परंपरेंतील एका धडाडीच्या माणसास स्थलांतराचा बेत सुचला. ज्या गांवांत लहानाचे मोठे झालों नि वाडवडीलांच्या वास्तव्यानें जे गांव पुनीत झाले तें गांव सोडण्याचा विचार सहजासहजीं येणें शक्य नाहीं नि त्याप्रमाणें स्थलांतर घडवून आणणेंहि अवघड. पण पेकाट मोडलेल्या अशा ढांसळलेल्या परिस्थितींत काढायचे दिवस तरी किती ? साहजिकच या माणसाचें लक्ष गगनबावड्याकडे वेधलें. जहागिरीच्या राजधानीचें गांव नि जहागिरदारांच्या मुक्कामाचें गांव, यामुळें लहान गांव असूनहि गगनबावडा भरभराटींत होतें. तिथवली गांवहि बावडा जहागिरींत मोडत असल्यामुळें गगनबावडा हें गांव तसें कांहीं परके वाटत नव्हतें.

श्रीमंत माधवराव मोरेश्वर हे त्या वेळचे जहागिरदार. गुणीजनांचे चहाते म्हणून त्यांची ख्याति होती. सर्व कलांचें ते भोक्ते होते. लहान

जहागिरी असूनसुद्धां निरनिराळे नामवंत कलावंत, नामांकित व्यक्ती त्यांचेकडे येत असत व आपल्या गुणक्रमानुसार मानसन्मान घेऊन जात असत. लोकप्रिय उदार राज्यकर्ता असल्यामुळें भरभराट होती त्या वेळीं गगनबावड्यांत !

अशा योग्य वेळीं बळवंतराव कारेकरांना गगनबावड्यास येण्याचा बेत सुचला नि त्याप्रमाणें ते आले सुद्धां. तिथली गांव सोडतांना वाईट वाटलें त्यांना, पण काय करावयाचें ? पूर्वपरंपरेनें पुनीत झालेल्या पण दरिद्रावस्थेस कवटाळून बसलेल्या परिस्थितींत रुतावयाचें कीं उत्कर्षाची वाटचाल करण्याकरितां धडपडावयाचें हा प्रश्न होता त्यांचेपुढें नि त्याचें उत्तर सोडवावयाचें होतें गगनबावड्यांत !

हुशार माणूस कशालाच डरत नाहीं फक्त परिस्थितीची प्रतिकूलता नसली म्हणजे झालें. गगनबावड्यास येणें सोपें होतें, पण काम सुरू करणें अवघड होतें. कारण जागा अडवून बसलेले ठेकेदार त्यांची वाट काय ? ते काय सहजासहजीं आपला वाटा दुसऱ्याच्या पदरीं टाकतील ?

कसोटीच्या या प्रसंगीं बळवंतराव कारेकर नि त्यांचे वडील डगमगले नाहींत. हळुंहळू त्यांनीं कामास सुरवात केली. लवकरच आपला जम बसविला. नेकीनें, हुशारीनें नि मेहनतीनें केलेल्या कामास कां नाहीं यश येणार ? अेक प्रकारें ती तपश्चर्याच असते. या तपश्चर्येस फलप्राप्ति होण्याचीहि चिन्हें दिसूं लागलीं. जहागिरदारांचें लक्ष त्यांच्याकडे वेधूं लागलें.

पंत अमात्यांचीं कामें त्यांचेकडे येऊं लागलीं. विश्वास वाढूं लागला. जहागिरदारांच्या खास विश्वासांतील म्हणून त्यांची गणना होऊं लागली. पेठेंतील प्रमुख 'महाजन' म्हणून ते ओळखले जाऊं लागले. त्यांच्याच पुढारीपणाखालीं पेठेंतील सूत्रें हालूं लागलीं.

★ ★

## घुमारा फुटला—

बळवंतराव कारेकरांना चार अपत्यें; थोरले राजारामपंत, मध्यें दोन मुली नि धाकटे कृष्णाजीपंत. दोन भावांच्या वयांत वीस वर्षांचें अंतर. २४ नोव्हेंबर सन १८९९ या दिवशीं कृष्णाजीपंतांचा जन्म झाला.

घरची सांपत्तिक स्थिति बेताचीच असली तरी मातापित्यांचें प्रेमळ छत्र, वडील बंधूचें निस्सीम प्रेम, यामुळें कृष्णाजीपंतांचें बालपण सुखांत, आनंदांत गेलें.

वडील, पेठेंतील महाजन, जहागिरदारांचे विश्वासू, साहजिकच 'कृष्णा' सगळ्यांचा लाडका. जिकडे पहावें तिकडे आपुलकीच्या नजरा. कौतुकाचे हात सगळीकडे पसरलेले !

बालपण रम्य खरें पण सगळ्यांचेंच बालपण कांहीं रम्य नसतें. परिस्थितीची साद असणाऱ्यांचेंच बालपण विशेष रंगतें, खुलतें. अर्थात् परिस्थितीचें पाठबळ मिळावयास पूर्व पुण्याईचाच भाग अधिक. त्या दृष्टीनें कृष्णाजीपंत नशीबवान खरे !

लहानपणापासूनच 'वाड्या'वर मुक्काम असावयाचा. वडील जहागिरदारांचे विश्वासू, त्यामुळें जहागिरदारांच्याकडे त्यांचे नेहमीं येणें जाणें असावयाचें. 'कृष्णा' त्यांचेबरोबर असावयाचा. थोरामोठ्यांचीं मुलें संगतीला नि जहागिरदारांचीं मुलें सवंगडी. हंसायचें, खेळावयाचें, बागडावयाचें तें सर्व ह्यांच्या संगतींत.

भावी जीवनाची रूपरेषा बालपण ठरविते असें म्हणतात, तें उगीच नाहीं. राजेराजवाड्यांच्या संगतींत कालक्रमणा करावी लागणार म्हणून कीं काय पूर्वतयारी म्हणून कृष्णाजीपंतांचें बालपण जहागिरदारांच्या तैनातींत रूजलें, वाढलें.

बालपणांतील संस्कार भावी जीवनाच्या दृष्टीनें मार्गदर्शक होतात. श्रीमंतांच्या आवडीनिवडी, त्यांचे रीतिरिवाज, त्यांचें बोलणें चालणें, त्यांचें स्वभावविशेष या सर्वांचें नकळत ज्ञान त्यांच्या संस्कारपटलावर कोरलें गेलें.

आज अनेकविध बड्या असामींचा स्नेह कृष्णाजीपंतांनी संपादिलेला आहे. 'कारेकर शेठ' नसले म्हणजे चुकल्या चुकल्या सारखें वाटतें इतपत घरोबा नि तोहि राजेराजवाड्यांच्यांत ते करूं शकले, याचें अनेकाना रहस्य वाटतें. एका 'कारागिरा'स हें कसें जमूं शकलें याबद्दल बऱ्याच जणांना आश्चर्य वाटतें. पण कृष्णाजीपंतांचें बालपण ज्या संस्कारांत वाढलें त्या संस्कारांनींच त्यांना या 'घरोब्या'स साथ दिली आहे यांत शंका नाहीं.

★ ★

# कलेच्या माहेर घरीं—

माणसाचें जीवन परिस्थितीनें घडत असतें, संस्कारांनीं वाढत असतें. एकादा नरवीर परिस्थितीवर मात करून विजयीध्वज फडकवितो पण अशीं उदाहरणें अपवादात्मकच. परिस्थिति जिकडे फरफटत नेईल तिकडे जावयाचें हा सर्वसामान्यांचा मार्ग !

पण केवळ परिस्थितीचें पाठबळ असूनहि भागत नाहीं. असेल त्या परिस्थितींत आदर्शाची उभारणी करणें, चांगुलपणाची कांस धरणें, श्रेष्ठत्व पटकावयास सरसावणें यांतच नरजन्माचें सार्थक असतें. मानवी जीवन सार्थकीं लागतें तें यामुळेंच.

आदर्श जीवनाची उभारणी करण्यास योग्य त्या मार्गदर्शनाची सदैव आवश्यकता असते. ध्येयाचा ध्यास घेऊन त्या पाठीमागें धांवणें सगळ्यांनाच जमतें असें नाहीं. ध्येय ठरविणें जमतें पण त्या ध्येयाप्रत जाण्याचा योग्य तो मार्ग दर्शविण्याकरितां मार्गदर्शनाची आवश्यकता असते. या वाटचालीस साहाय्यभूत अशा मदतनिसांची आवश्यकता असते.

मातापिता हे पहिले मार्गदर्शक. बळवंतराव कारेकरांची मनीषा कृष्णानें 'चार बुकें' जास्त शिकावीत, 'हपीसर' व्हावें, घराण्याची शान वाढवावी; पण कृष्णाचें मन शाळेंत फारसें रमणारें नव्हतें. शाळेंत नियमित जावयाचा पण मूळाक्षरांबरोबरच चित्रकलाहि पाटीवर उतरूं लागायची. बळवंतराव काय समजावयाचें तें समजले.

बळवंतराव वृद्ध झालेले, त्यांत दम्याचा विकार बळावला. साहजिकच सुपुत्र राजारामपंतांनीं संसाराचा सर्व भार आपल्या शिरावर घेतला. थोर पित्याचे ते कर्तबगार चिरंजीव. बेताचेंच शिक्षण, पण बुद्धि मोठी तल्लख ! कोणत्या वेळीं कसें बोलावें, कसें वागावें याचें पूर्ण व्यवहारी ज्ञान त्यांना. अंतःकरणाचें अत्यंत मायाळू, चेहऱ्यावर सदैव प्रसन्नता,

कै. बळवंत लक्ष्मण कारेकर





कै. राजारामपंत बाळशेट कारेकर

वाणी मोठी गोड. अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्व, पाहिलें कीं आदर वाटावा. बोललें कीं सदैव ते बोलत राहावेंत असें वाटावें. अशा दादांचें (राजारामपंतांचें) मार्गदर्शन कृष्णाजीपंतांना लाभावें यापेक्षां चांगली गोष्ट कोणती?

कारेकर दैवज्ञ कुलोत्पन्न. विश्व निर्माण करणाऱ्या विश्वकर्म्यांचें वंशज. कलाकुसरीचें काम करणें हा पिढीजात व्यवसाय. हा वारसा ठसठशीतपणें सिद्ध करण्याकरितांच कृष्णाचा जन्म आहे हे दादांनीं ओळखलें. कृष्णाला सोनार कामांतच गुंतवून ठेवावें असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. उलट आपल्या कृष्णानें मोठे व्हावे,, नांव कमवावें, मानमरातब मिळवावा ही दादांची प्रथमपासूनची इच्छा. आणि याच दृष्टीनें पद्धतशीर मार्गदर्शन व योजनाबद्ध आंखणी त्यांनीं केली.

प्लेगच्या प्रादुर्भावामुळें सगळ्यांना गगनबावडा सोडून कोल्हापुरास यावें लागलें. कलापूर म्हणून ख्यातनाम असलेल्या कोल्हापूर शहरांत चित्रकलेचें प्राथमिक पाठ घेण्याकरितां कृष्णानें यावें म्हणूनच कीं काय गगनबावड्यासारख्या आडवळणी गांवांत प्लेगची सांथ उद्भवली? विधात्याचा हेतु कांहींहि असो, कारेकर कुटुंबाचें हें स्थलांतर कृष्णाच्या शिक्षणाच्या दृष्टीनें उपयोगी पडलें हें खरें!

सोनार काम शिकतां शिकतांच कृष्णा चित्रकलाहि शिकूं लागला. पहिल्याच वर्षी थर्डग्रेड ड्रॉईंगची परिक्षाहि उत्तीर्ण झाला. बळवंतराव घाटगे या चित्रकला शिक्षकाचा कृष्णावर मोठा लोभ. हे शिक्षक अनुभवी होते, नांवाजलेले होते. नामांकित शिक्षकाचा आवडता शिष्य, मग, प्रगति कशाला अडून बसायला? हां हां म्हणता प्रगति होऊं लागली. चित्रकला प्रसन्नतेनें कृष्णाच्या हातांत उतरूं लागली, बोटें सरावूं लागलीं, मन सौंदर्यासक्त होऊं लागलें.

याच वेळीं श्रीगणेशोत्सवाची तयारी कोल्हापुरांत सुरूं झाली. श्रीगणेशाच्या नानाविध मूर्ती बनविण्यांत कोल्हापूरच्या जिनगरे लोकांचा हातखंडा. कृष्णाचें कलाप्रिय मन साहजिकच तिकडे आकृष्ट झालें. मूर्ती तयार करण्याचा आवडता छंद पूर्वीपासून होताच, आतां आणखी ज्ञान संपादन करण्याची संधी मिळाली. जास्तींत जास्त ज्ञान मिळविण्यास आतुर असलेलें त्याचें मन त्याला स्वस्थ कसें बसूं देईल ? जिनगर लोकांच्या सान्निध्यांत कृष्णा रमूं लागला. घोटकाम करूं लागला. रंगकामहि करूं लागला, क्रियाप्रक्रियांची माहिती मिळाली. योग्य तें ज्ञान मिळविण्यास या माहितीचा बराच उपयोग झाला.

सोनार कामास—विशेषतः कलाकुसरीच्या कामास—हरतऱ्हेच्या डायी लागतात. आवट्या व डायी तयार करणें मोठें कसबाचें काम व हें विनासायास जमणें अगदीं अशक्य ! अशक्य तें शक्य करणें हा तर कलावंताचा धर्म. कृष्णा निरनिराळ्या तऱ्हेच्या आवट्या तयार करूं लागला. आवट्या तयार करण्यास पोलादी हत्यारेंहि स्वतः बनवूं लागला आणि हें सर्व वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी ! दादांच्या नजरेखालीं, त्यांच्या मार्गदर्शनाखालीं हें काम चालूं होतें.

आतां नजर बसून गेली होती. एकदां नजर फिरायचा अवकाश, त्यांतलें सौंदर्य टिपलें गेलेंच. साहजिकच कलाकुसरीचें काम करणें हा हातचा मळ होऊन बसला ! निरनिराळ्या डिझाइन्सचें सोन्याचांदीचे दागिने कृष्णा तयार करूं लागला. पट्टीचा कारागिर म्हणून सगळ्या कोल्हापुरांत तो ओळखला जाऊं लागला. कर्तबगारीचा ‘ सुगंध ’ दरवळूं लागला.

★ ★

# आश्रयदात्यांचें औदार्य आणि कलेचा विकास

केवळ ज्ञान असून भागत नाहीं. एकाद्या गोष्टींत तरबेज असलें म्हणजे भागलें असेंहि नाहीं. माणूस पुढें येतो तो केवळ या कारणामुळें नव्हे. ज्ञान पाहिजेच पण त्याबरोबरच आणखी कांहीं बाबी असाव्या लागतात. कोणाचा तरी आधार, कोणाचा तरी आश्रय हवा असतो. एकमेकांच्या सहाय्यानेंच प्रगति होत असते.

कर्तबगारीची बूज राखणारीं माणसें बालवयापासूनच मिळणें याला भाग्य लागतें. बळवंतराव कारेकर व राजारामपंत कारेकर यांचेवर पंतअमात्य माधवराव मोरेश्वर यांचा विशेष लोभ होता. गुणी जनांची पारख करणें, हरतऱ्हेच्या कलावंतांना उत्तेजन देणें यांवर त्यांचा विशेष कटाक्ष होता. त्यांच्या नजरेंतून 'कृष्णा'चा छंद सुटणेंच शक्य नव्हतें. त्यांनीं जाणलें कीं या मुलाचें लक्षण 'कलावंता'चें आहे. त्याच्या कलेला प्रोत्साहन दिलें, उत्तेजन दिलें तर तो उत्तम चित्रकार होईल, मूर्तिकार होईल.

या दृष्टीनें अगदीं बालवयापासूनच पंतअमात्यांनीं त्यांचेवर लक्ष ठेवलें. पाटीवर चित्रें काढून घ्यावयाचीं नि खाऊ द्यावयाचा, शाबासकी द्यावयाची एथपासून तो 'एन्ग्रेव्हिग'चें शिक्षण घेण्याकरितां मुंबईस पाठविण्यापर्यंत त्यांचा अखंड आश्रय होता. देवांच्या निरनिराळ्या मूर्ती, हरतऱ्हेचे सोन्याचांदीचे दागिने, लग्नमुंजी प्रसंगाच्या निमित्तानें डेकोरेशन्स, श्रीराम जन्मोत्सवाच्या वेळीं मखर तयार करणें, निरनिराळ्या प्रकारच्या रांगोळ्या काढणें—अशा अनेकविध गोष्टी तयार करून घेऊन 'कृष्णां'तील कसब कायम राखण्याच्या दृष्टीनें व तें 'वर्धिष्णु' व्हावें याकरितां त्यांनीं विशेष कटाक्ष बाळगला. चित्रकलेस साहाय्यभूत म्हणून 'फोटोग्राफीस' वाव

करून दिला. जीवनाचा प्रश्न सुलभ रीतीनें सुटावा म्हणून नोकरी दिली, शेतजमिनी दिल्या. शिकारीच्या निमित्तानें बाहेर जाऊन सौंदर्यस्थळांचें निरिक्षण करतां येईल म्हणून आपल्या 'कॅंपा'तून शिकारीस घेऊन गेले. एवंच जेणेंकरून कलाविकास पावेल, कलात्मकता वाढेल अशा तऱ्हेचें साहाय्य त्यांनीं केलें. 'नामवंत मूर्तिकार' पुढें आणण्यास त्यांचेंच साहाय्य विशेष उपयोगी पडलें.

अनेकविध कामें हाताखालून गेल्यामुळें कामांत चांगलीच तयारी झाली होती. आपल्या कलेचें चीज सर्वत्र व्हावें ही सुप्त आकांक्षा मनांत होती नि त्याप्रमाणें घडून आलेंहि. श्रीमंत पंतअमात्य बावडेकर यांचे निरनिराळ्या संस्थानिकाशीं निकटचे संबंध होते. याचा फायदा कृष्णाजी-पंतांना चांगलाच झाला. कलेचे भोक्ते व गुणी चहाते अशा पंतअमात्यांनीं पदरीं बाळगिलेल्या कारागिराकडूनच आपलीं कामें व्हावीं याबद्दल चढाओढ लागून गेली. सोन्याचांदीचें काम म्हणजे जोखमीचें काम आणि असें हे जोखमीचें काम मनपसंत होणें आवश्यक. ही दुहेरी जबाबदारी पेलण्यास कृष्णाजीपंतच योग्य आहेत हे या संस्थानिकांनीं ओळखलें. त्यायोगें 'कारेकरशेठ' यांची संस्थानिकांच्या खास कारागीरांत प्रामुख्यानें गणना झाली.

श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि – औंध संस्थानचे प्रमुख–हे कलेचे निस्सीम उपासक होते. निरनिराळ्या कलात्मक वस्तू जमविणें हा त्यांचा आवडता छंद. लाखों रुपये त्याकरितां त्यांनीं वेंचले. महाराष्ट्रांत ख्यात-नाम असलेलें औंधचें म्युझियम अशा छंदांतूनच निर्माण झालें आहे. ते स्वतः उत्तम चित्रकार होते. पौराणिक व ऐतिहासिक व्यक्तींचे व प्रसंगांचे देखावे त्यांनीं स्वतः चितारले व छापून प्रसिद्धहि केले. पुरोगामी विचार-सरणी, निकोप शरीरसंपादनेवर कटाक्ष, स्वदेशीवर नितांत श्रद्धा या

विशेषत्वामुळें त्यांची कारकीर्द संस्मरणीय झाली. औंधकरांची निरनिराळी कामें–सोन्याचांदीच्या मूर्ती–कृष्णाजीपंतांनीं करून दिलीं. कामावर बेहद्द खूष झाले औंधकर ! कृष्णाजीपंतांना स्वदस्तुरीनें खालील शिफारस-पत्र या दृष्टीनें उल्लेखनीय आहे. ‘ रसज्ञ ’ कलावंताकडून मिळालेला हा मानमरातब कौतुकास्पद नाहीं काय ?

*“ रा. कृष्णाजी बळवंत कारेकर यांना श्रीराम, लक्ष्मण, सीता व मारुतीच्या चांदीचिया मूर्ती करणेस आम्हीं सांगितलें. त्याप्रमाणें सदरहू चारी मूर्ती त्यांनीं कुशलतेनें, काळजीपूर्वक व आम्हीं पुरविलेल्या फोटो बरहुकूम तयार करून दिल्या हें त्यांना अत्यंत भूषणावह आहे. सदर मूर्तीचें नक्षीकाम, त्यांची ठेवण, वस्त्रें नेसण्याची तऱ्हा एकंदर सर्व कुसरकाम व पॉलीशकाम अत्यंत बारकाईनें व विलक्षण हातोटीनें केलें आहे. त्यांनीं कोरलेल्या मूर्ती म्हणजे आमचे कलाकौशल्याचे संग्रहांतील हिंदी कारागिरीचा उत्कृष्ट नमुना म्हणून समजणेस कांहींच प्रत्ययवाय नाहीं.”*

Sd/. **B. S. Pant**
Chief of Aundh

वयाच्या तिशींत केलेली कामाची ही प्रगति निःसंशय प्रशंसनीय आहे.

श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन–मिरंजेचे अधिपति–स्वभावानें थोडे कडक. योग्य तें काम योग्य त्या वेळीं मनाप्रमाणें होण्याबद्दल त्यांचा कटाक्ष. वावगें असें कांहीं त्यांना खपावयाचें नाहीं. बावडेकरांच्या माहितीनुसार त्यांनीं कृष्णाजीपंताच्याकडे कांहीं कामें सोपविलीं. श्रीगजाननाच्या चांदीच्या मूर्ती त्यांनीं करून घेतल्या. राणीसाहेबांचा नि स्वतःचा आणि गणपतीचा असा फोटो सोन्याच्या पत्र्यावर एनग्रेव्ह करून घेतला. हें काम त्यांना फारच आवडले नि कृष्णाजीपंतांच्यावर त्यांची विशेष मर्जी बसली. कृष्णाजीपंतांचा स्वभावविशेषच असा कीं त्यांच्याशीं जडलेले संबंध सहसा तुटत नाहींत.

★ ★

# जीवनांतील चढउतार—

बावडेकरांचें नि जमखिंडीकरांचें नात्याचे व घरोब्याचे संबंध. जमखिंडीच्या राजघराण्याशीं कृष्णाजीपंतांचा जो १९२४ पासून संबंध आला तो अद्यापि आहे. मूर्तींचीं कामें, दागिन्याचीं कामें या निमित्तानें राजेसाहेब शंकरराव आप्पासाहेब यांचेशीं संबंध आला तो दिवसें दिवस वाढत गेला. निरनिराळ्या अडीअडचणींस त्यांचा विशेष उपयोग झाला.

१९४० ते १९४५ हा कालखंड कृष्णाजीपंतांना फारच त्रासाचा गेला. पत्नीचें आजारीपण, तिचा मृत्यु यामुळें त्यांना फारच त्रास झाला. या मानसिक व आर्थिक कुचंबणेच्या काळांत जमखिंडीकरांच्या आश्रया-मुळेंच कृष्णाजीपंत तग धरूं शकले.

१९४७ सालीं श्रीमंत शंकरराव कैलासवासी झाले. कृष्णाजीपंतांचा मोठा आधार नाहींसा झाला. अर्थात् बावडेकरांचे व जमखिंडीकरांचे संबंध अत्यंत निगडित असल्यामुळें श्रीमंत बापूसाहेब जमखिंडीकर यांनीं आपल्या साहाय्याचा हात कृष्णाजीपंतांना दिला. त्यांच्या मदतीमुळें, सहकार्यामुळें कृष्णाजीपंतांची आर्थिक ओढाताण थांबून स्थिर जीवनाचा लाभ झाला. विस्कटलेली आर्थिक घडी नीट बसली गेली.

श्रीमंत बापूसाहेबांचा स्वभाव अगदीं सरळ होता. विचारसरणी पुरोगामी होती. धडाडी होती, कर्तृत्व होतें. लोकराज्याला पहिली साथ त्यांनीं दिली. आपलें संस्थान भारतीय संघराज्यांत प्रथम त्यांनीं विलीन करून लोकशाहीचा पहिला मान मिळविला. 'राजा झाला तरी तो माणूसच', त्यालाहि श्रम करणें आवश्यक म्हणून त्यांनीं कांहीं वर्षें एस. टी. मध्यें आणि नंतर पुणे म्युनिसिपल ट्रॅन्स्पोर्टमध्यें नोकरी केली. चोख कामगिरी बजावून तेथेंहि यांनीं लौकिक मिळविला. श्रीमंतांचें नि कृष्णाजीपंतांचें संबंध वाढतच गेले. कृष्णाजी पंतांचा जिव्हाळा इतका

निर्माण झाला की 'कारेकरशेठ' जमखिंडीकर कुटुंबांतीलच एक समजले जाऊं लागले. त्यांच्या लग्नप्रसंगीं इंदूरला जी कांहीं खास मंडळी गेली होती त्यांत कृष्णाजीपंत प्रामुख्यानें होते प्रसंगानें माणूस अधिक जवळ येतो असें म्हणतात. श्रीमंतांना मोठा अपघात झाला व त्यामुळें ते बरेच आजारी पडले. कृष्णाजीपंतांनीं त्यांची मनोभावें सेवा केली व श्रीमंतांच्या हृदयांत कायमचें स्थान मिळविलें. 'मृत्यूनंतर इस्टेटीसंबंधानें करावयाच्या तजविजीसाठीं'' जी कांहीं निवडक मंडळीं 'मृत्यु-पत्रांत' नमूद करण्यांत आली होती त्यांत 'कारेकरशेठ' यांचा अंतर्भाव आहे हें विशेष नमूद करण्यासारखें आहे. इतका विश्वास नि घरोबा त्यांनीं निर्माण केला होता.

पुढें श्रीमंत बापूसाहेब ऐन तारुण्यांत कावीळीच्या विकारानें वारले. कृष्णाजीपंतांच्यावर झालेला हा सर्वांत मोठा आघात. आत्यंतिक दुःखाचा हा प्रसंग.

जमखिंडीकरांचे नि कृष्णाजीपंतांचे संबंध सहजासहजीं तुटणारे नव्हते. दिनींप्रतिदिनीं ते वाढतच होते. श्रीमंत बापूसाहेब यांच्या मातोश्री या पंतअमात्य माधवराव मोरेश्वर यांच्या सुकन्या, शांताक्का उर्फ लीलावती देवी यांचा बालपणापासूनच कृष्णाजीपंतांचा नि त्यांचा परिचय. मातोश्री लीलावतीदेवी या सहृदय अंतःकरणाच्या नि कर्तबगार पित्याच्या कर्तबगार सुकन्या. १९३७ सालीं राजेसाहेब शंकरराव आप्पासाहेब विलायतेस गेल्यावेळीं 'रिजंट' म्हणून जमखिंडी संस्थानचा कारभार त्यांनीं पाहिला होता व तो यशस्वीरित्या सांभाळला होता. त्यांनीं यशस्वी कारकीर्द करून दाखविल्याबद्दल ब्रिटिश सरकारनें त्यांना 'कैसर-ई-हिंद' सुवर्णपदक देऊन त्यांचा मोठा सन्मान केला.

एकुलत्या बंधूचें निधन व पति निधनानंतर पुत्रनिधन अशा आघातामुळें त्यांचें मन संसाराला विटलें असून विरक्त वृत्तीनें त्या वागत आहेत.



कै. श्रीमंत माधवराव मोरेश्वर पंत अमात्य
ग. बावडा.



ग्रुप फोटो :– जमखंडी राजघराणें
श्रीमंत शंकरराव आप्पासाहेब पटवर्धन, राजासाहेब, जमखंडी,
श्रीमंत बापूसाहेब, श्रीमंत ताईसाहेब, श्रीमंत लिलावतीदेवी राणीसाहेब

सध्यां भजनपूजनांत वेळ घालवावयाचा, साधुसंतांचीं भजन-कीर्तनें ऐकत दिवस घालवावयाचे असा त्यांचा कार्यक्रम. असें जरी असलें तरी कृष्णाजीपंतांच्यावर त्यांची पूर्ण दृष्टि आहे.

श्रीमंत बापूसाहेब, त्यांच्या पत्नी लैलादेवी या सुप्रसिद्ध सरदार किबे घराण्यांतील. इंदोरचे सरदार किबे घराणें सुप्रसिद्ध असून अशा ख्यातनाम घराण्याशीं जमखिंडीकरांचा संबंध जडावा हा मणिकांचन योगच म्हणावयाचा.

मोठ्या घराण्यांतील पण गर्व नाहीं, लहानथोर नोकरचाकर या सर्वांशीं प्रेमळ वागणूक असल्यानें विचारपूस करावयाची, दुःखितांना दिलासा द्यावयाचा, आनंदितांचा आनंद द्विगुणित करावयाचा असा स्वभाव लैलादेवींचा. श्रीमंत बापूसाहेब व कृष्णाजीपंत यांचा घरोब्याचा संबंध लैलादेवींनीं पाहिला होता, अनुभविला होता नि आपल्या आवडत्या पतिराजांच्या निष्ठा काळजीपूर्वक जतन करण्यांत दक्ष राहणाऱ्या लैलादेवी यांचा कृष्णाजीपंतांच्यावर पूर्ण लोभ आहेच; एवढेंच नव्हे तर त्यांच्या मुलाबाळांनाहि कारेकरांच्याबद्दल प्रेम आहे. बालराजे प्रणय व राजकन्या प्रवासिनी नि बालराजे प्रतीक यांना काकांच्याबद्दल विशेष आपुलकी असून ते फार दिवस भेटले नाहींत म्हणजे चुकल्याचुकल्यासारखें होतें त्यांना.

श्रीमंत लैलादेवींच्यामुळें इंदोरच्या किबे घराण्याशीं कृष्णाजीपंतांचा संबंध आला नि तो दिवसेंदिवस वाढतच आहे.

श्रीमंत माधवराव मोरेश्वर यांचे पुत्र श्रीमंत भाऊसाहेब हे अल्पायुषी ठरले. त्यांच्या कर्तबगार पत्नी श्रीमती शशिकलादेवी पंडित या आपल्या आवडीच्या क्षेत्रांत खूप काम करीत आहेत. मॉंटेसरी शिक्षण-गर्ल गाईड्स नि कोल्हापूर शहर यांचा जेव्हां विचार होतो तेव्हां श्रीमती शशिकला-देवींचा प्रामुख्यानें उल्लेख होतो. सुविद्य अशा रास्ते घराण्यांतील नि

परदेशी प्रवास करून आलेल्या नि सार्वजनिक कामाची विशेषतः शैक्षणिक कामाची आवड असलेल्या श्रीमती शशिकलादेवी यांचा सल्ला व मदत कृष्णाजीपंतांना–काकांना–वेळोवेळीं मिळत असल्यामुळें त्यांचें काम बरेंचसें सुकर होत असतें.

श्रीमंत कुरुंदवाडकर, श्री. सरदार रास्ते, श्री. सरदार किबे, अशा नानाविध ख्यातनाम व्यक्ति ‘कारेकर शेठ’ यांच्यावर आपलीं सोन्या-चांदीचीं कामें बिनधोकपणें सोपवितात व कृष्णाजीपंतहि त्यांच्या मनपसंतीस उतरतील असे कलकौशल्यपूर्ण दागिने तयार करून देऊन वाहवा मिळवितात.

विश्वासानें विश्वास वाढतो. विश्वास वृद्धिंगत होतो. कामें वाढूं लागतात. भरभराट मागें येत असते.

★ ★

# कलेची साध्यता—

प्रसंगानें कर्तबगारीची तपासणी होत असते. कर्तबगारीला कस लावण्याचें काम काळ करीत असतो नि मानवाच्या आयुष्यांत असे कांहीं प्रसंग येऊन जातात कीं ते कठीण तर असतातच, पण त्याबरोबरच त्याच्या कर्तबगारीची परीक्षाही होत असते. कृष्णाजीपंतांच्या कलाजीवनांत असे प्रसंग आले नि त्यांतून ते विजयी मुद्रेनें बाहेर पडले.

गगन बावड्याचे पंतअमात्य माधवराव मोरेश्वर यांच्या निधनानंतर जहागिरींत 'मायनॉरिटी' होती. श्रीमंत भाऊसाहेब शिक्षण घेत होते. आणि सिंक्लेअर साहेब त्यांचे गार्डीयन होते. श्रीमंत भाऊसाहेबांनीं सांगितलें कीं सिंक्लेअर साहेबांचा 'स्टॅच्यू करून द्या.' युरोपियन साहेब, कलेचा भोक्ता नि मार्मिक निरीक्षक! आज्ञेचें पालन करावयाचेंच पण गोऱ्या साहेबाचें समाधान कसें करावयाचें? समय कठिण होता पण कृष्णाजीपंत डगमगले नाहींत, उलट इर्षेनें कामास लागले, गोऱ्या साहेबा-कडून शाबासकी मिळवावयाचीच या जिद्दीनें ते खपूं लागले.

पुतळा तयार झाला. तो घेऊन ते सिंक्लेअर साहेबांच्या बंगल्यावर गेले. साहेब मोठा धूर्त नि हुषार. कृष्णाजीपंतांच्या कलेची एका वेगळ्या तऱ्हेनें पण खरीखुरी परीक्षा पाहण्याचें त्यानें ठरविलें. तो आंत गेला नि आपल्या मुलास व बायकोस बाहेर पाठवून दिलें. बालक मोठा हुषार नि चुणचुणीत, बुद्धि चौकस, त्याचें लक्ष टेबलावरील पुतळ्याकडे गेलें नि 'डॅडी' 'डॅडी' असा सहजस्फूर्त आवाज त्याच्या मुखांतून बाहेर आला. बायकोनेंही 'लाईकनेस' छान जमल्याचें सांगितलें. कृष्णाजीपंतांना धन्यता वाटली. खऱ्याखुऱ्या कसोटीस ते पूर्ण उतरले होते. लहान मुलाकडून परीक्षा घेवविण्यांत सिंक्लेअर साहेबांची हुषारी खरी पण या

दिव्य परिक्षेंतहि- उत्तीर्ण होण्यास जें मूर्तिकौशल्य अंगीं लागतें तें असल्याबद्दल कृष्णाजींपंतांचें किती कौतुक झालें.

"I have much pleasure in stating that Mr. K. B. Karekar has executed a bust of me in ivory. He has produced remarkably good likeness, and has done the whole work from photograph except for my very short sitting.

7-3-31

Capt. **Chinclair**
Political Agent,
KOLHAPUR.

कारेकरांना दिलें गेलेलें हें प्रशस्तीपत्र त्यांनीं बजाविलेल्या अजोड कामगिरीचा पुरावा नाहीं काय?

मायनॉरिटी नंतर श्रीमंत भाऊसाहेब यांनीं जहागिरीचा कारभार आपले हातीं घेतला, आणि तो उत्तम तऱ्हेनें चालविला. त्यांना शिकारीचा फार षोक होता. तसेंच त्यांनीं विलायतची सफर करून आणि परदेशांत अनेक ठिकाणीं प्रवास करून ज्ञान संपादन केलें. त्यांचा स्वभाव अत्यंत निगर्वी व उदार होता. एकदां त्यांनीं एकाद्या व्यक्तीस आपले म्हणून मानलें म्हणजे ते त्यावर अतिशय जिव्हाळ्याचें प्रेम करीत. त्यांनीं कृष्णाजीपंतांना आपला विश्वासू मित्र मानिलें होतें. परंतु दुर्दैवानें सन १९४२ मध्यें ते कैलासवासी झाले. त्यांची कारकीर्द अल्प ठरून कृष्णाजीपंतांचा एक मोठा आधार नाहींसा झाला.

श्रीमंत भाऊसाहेब यांच्या थोरल्या राणीसाहेब श्री. कमलादेवी यांनीं सुमारें दोन वर्षांच्या अवधीनंतर श्रीमंत रामचंद्रपंत अमात्य उर्फ भय्यासाहेब यांना दत्तक घेतलें. श्रीमंत भय्यासाहेब यांनींहि पूर्वीप्रमाणेंच काकाजींच्या बरोबर आजतागायत घरोबा ठेवून स्नेहाची गंगोत्री अखंड चालविली आहे.

* *

90329

# मूर्तिकाराची लोकमान्यता—

कोल्हापूर येथें अखिल दैवज्ञ परिषद १९२० सालीं भरली होती. विश्व निर्माण करणाऱ्या विश्वकर्म्यांचे वंशज असे जे दैवज्ञ, त्या दैवज्ञ ज्ञातींत कलाकुसरीचें काम करणारे एकापेक्षां एक वरचढ. अखिल दैवज्ञ जातींतील कलावंतांनीं तयार केलेल्या निरनिराळ्या कलात्मक वस्तूंचें प्रदर्शन कोल्हापुरांत भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनाचे उद्‌घाटक होते, छत्रपती राजाराम महाराज. कृष्णाजीपंतांना वाटलें कीं, आपल्या कारागिरीची परीक्षा देण्यास ही नामी संधी आहे. एनग्रेव्हिंग केलेल्या कांहीं कलावस्तु त्यांनीं या प्रदर्शनांत ठेवल्या. त्यांच्या या कलावस्तु सर्वोत्कृष्ट ठरून त्यांना 'ना. नाना शंकरशेट गोल्ड मेडल्' व सर्टिफिकेटस मिळालीं. ज्ञातिबांधवांनीं कलेचें कौतुक केलें, बहुमान केला गेला. उत्कृष्ट कारागीर म्हणून गौरव झाला आणि तो वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी.

सन १९३० सालीं हिंदुस्थानचे त्या वेळचे व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन कोल्हापुरांत आले होते. भव्य असें प्रदर्शन त्या वेळीं भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शन विभागांत श्रीरामाच्या मूर्ती व हस्तीदंताचा व्हाईसरॉय साहेबांचा पुतळा कृष्णाजीपंतांनीं ठेवला होता. लॉर्ड आयर्विन यांची प्रत्यक्ष भेट होण्याची संधी यामुळें कृष्णाजीपंतांना मिळाली. गाडींतून उतरत असतांना फोटो घेऊन अवघ्या ४८ तासांत हस्तीदंती बस्ट पुतळा तयार केल्याबद्दलची हकीगत छत्रपतींनीं व्हाईसरॉय साहेबांना सांगितली. व्हाईसरॉय साहेबांनीं गौरवोद्गार काढले. योग्य तें बक्षीसहि मिळालें. हिंदुस्थानच्या त्या वेळच्या सर्व सत्ताधीश असलेल्याकडून कामाचा गौरव झाला. कलेचें चीज झालें.

अशीं अनेकविध कामें अगदीं अल्प काळांत, हां हां म्हणतां करून देऊन आपल्या जलदपणाची आणि त्याहीपेक्षां कलाकौशल्याची साक्ष त्यांनीं पटवून दिली. नानाविध मूर्तींचीं कामें, चांदीच्या मूर्ती, सोन्याच्या मूर्ती, हस्तीदंती मूर्ती, चंदनाच्या मूर्ती इत्यादि विविध प्रकारचीं कामें करून त्यांनीं 'मूर्तिकार कारेकर' अशी लोकमान्यता मिळविली.

आतां वयोमानाप्रमाणें कृष्णाजीपंत स्वतः विशेषसें काम करीत नाहींत, नि ते सराफी, जव्हेरी वगैरे व्यापारी कामांत गढलेले आहेत. असें जरी असलें तरी 'कृष्णाजीपंत कारेकर' वा 'कारेकर सराफ' असे ते जास्त परिचित नसून 'मूर्तिकार कारेकर' म्हणूनच ते ओळखले जातात.

कलेची एकनिष्ठपणें केलेल्या सेवेबद्दल मिळालेला तो बहुमान आहे.

★ ★

# श्रद्धेची जागृति आणि कला—

मानवानें जरी आपापल्या उद्योगांत गर्क राहाणें चांगलें तरी ज्याच्या कृपाप्रसादानें नि ज्याच्या मायेच्या सांवलींत आपण राहात आहोंत, त्या दयाघन परमेश्वराची आठवण नेहमीं ठेवीत असावें. प्रपंचाचाच भार सांभाळतां सांभाळतां जीव नकोसा होऊन जातो नि 'प्रपंच नेटका' करण्याकरितां जितका वेळ घालवावा तितका अपुराच पडतो पण तरीहि परमेश्वराचें विस्मरण होऊं देणें केव्हांहि अनिष्ट.

१९५० सालीं कृष्णाजीपंतांनीं श्रीरामेश्वराची यात्रा करण्याचें ठरविलें. दयाघन प्रभूच्या सेवेंत दररोज थोडासा वेळ देत असलों तरी आणखी कांहीं सेवा करावी, तीर्थस्थळें पाहावीं, साधु-संतांचें दर्शन घ्यावें, पवित्र नद्यांत स्नान करावें हा उद्देश त्यांचेपुढें होता.

श्रीमती छबुताई नंदगांवकर यांची सोबत होती. त्यांनीं दक्षिणेकडील सर्व तीर्थस्थळें पाहिलेलीं होतीं. त्यांचा स्वभावहि होता बोलका नि वागणें होतें अगत्याचें, त्यामुळें कृष्णाजीपंतांना सर्व तीर्थस्थळें व्यवस्थितरित्या पाहातां आलीं.

१०–१–५० ते ८–२–५० असा हा दक्षिण देशचा प्रवास झाला. श्रीरामेश्वर, कन्याकुमारी, त्रिवेंद्रमचे पद्मनाभ मंदिर, त्रिचनापल्लीच श्रीरंगमदेवालय, जंबुकेश्वर देवालय, गणपती मंदीर, कुंभकोणंची सहा देवालयें, चिदंबरचें नटराजन् देवालय, शिवकांची, विष्णुकांची, श्रीकामाक्षीचें देवालय, मद्रास शहर, मधुरामीनाक्षी, श्रीगोविंद यांचें देवालय, श्रीपद्मावतीचें देवालय, व्यंकटगिरी, बेंगलोर शहर, श्रीरंगपट्टण, चामुंडा हिल, म्हैसुर, हरिहर, हुबळी, अशीं सर्व स्थळें पाहून नि स्नानें, तीर्थदानें– सर्व धार्मिक विधी व्यवस्थितरित्या पार पाडून कृष्णाजीपंतांचा हा प्रवास सुखाचा झाला– मनाला शांति मिळाली.

या झालेल्या तीर्थयात्रेमुळें मनाच्या धार्मिक वृत्तीचें जरी समाधान झालें तरी अंतःकरणातील कलावंत कृष्णाजीपंतांना कसा स्वस्थ बसूं देणार ? या प्रवासांत जीं भव्य मंदिरें, गोपुरें आणि आदर्श मूर्ती पाहावयास मिळाल्या, त्या मंदिरांच्या दगडावरील अलौकिक कोरीव कामें पाहून त्यांचें कलावंत मन प्रसन्न झालें. भारताच्या शिल्पकलेचें आणि स्थापत्य शास्त्राचें भव्य दर्शन या यात्रेमध्यें सार्थ रीतीनें घडलें. त्याचप्रमाणें मूर्तींचे दागदागिने, विविध अलंकार, वहानें यावरील कलाकुसर त्यांनीं पिपासु-वृत्तीनें पाहिल्या. मंदिरांतील जामदारखान्यांत असलेलें मौल्यवान जवाहीर आणि त्यांचे बनविलेले दागिने पाहून त्यांचें मन तृप्त झालें. भारताच्या दक्षिण टोकावर कन्याकुमारी येथें एकाच दृष्टिक्षेपांत तीन समुद्राच्या त्रिवेणी संगमाचें मनोहारी दृश्य मनसोक्त पाहून घेतलें. कन्याकुमारीची मूर्ति अत्यंत रेखीव, सौंदर्यानें परिपूर्ण भरलेली पाहून कृष्णाजीपंतांचें कलावंत मन भारावून गेलें. या दृष्टीनें विचार करतां त्यांनीं ही केलेली तीर्थयात्रा केवळ धार्मिक नव्हती तर कलेचीहि तीर्थयात्रा होती.

★ ★

श्रीमंत परशुरामराव उर्फ बापूसाहेब पटवर्धन राजेसाहेब जमखंडी,
श्रीमंत लैलादेवी राणीसाहेब जमखंडी





विलायतपर्यटन वेळचा फोटो—

श्रीमंत बापूसाहेब, श्रीमंत मा. लिलावती देवी, कृ. व. कारेकर.

# कलेसाठीं सातासमुद्रापलीकडे--

मानवाच्या जीवनांत अशा कांहीं अकल्पित घटना घडत असतात कीं त्यांची त्याला किंचितहि कल्पना नसते. किंबहुना अशक्य म्हणून ठरविल्या गेलेल्या गोष्टी शक्य करून दाखविणें हा तर जगन्नियंत्याचा नेहमीचा उद्योग.

कृष्णाजीपंतांच्या आयुष्यांत विलायतवारीचा वा समुद्रपर्यटनाचा योग आहे असें कोणा ज्योतिषानें सांगितलें असतें तरी त्यावर कोणाचा विश्वास बसला नसता. तसें पाहिलें असतां कृष्णाजीपंतांना इंग्रजीचें अगदीं जुजबी ज्ञान, नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा माणसानें युरोप सफरीचीं चित्रें स्वप्नांत तरी पाहिलीं असतीं का ?

पण—कृष्णाजीपंत युरोपचा दौरा करूं शकले–यशस्वीरित्या तो करूं शकले.

श्रीमंत बापूसाहेब जमखिंडीकर यांच्या मातोश्री लिलावतीदेवी यांचा युरोप प्रवास झाला नव्हता. कर्तबगार बापूसाहेबांना ही गोष्ट खटकत होती. अर्थात् या प्रवासास तशी कांहीं अडचण होती असेंहि नाहीं. पण म्हणतात ना–कोणतीहि गोष्ट घडून येण्यास वेळ यावी लागते..

ब्रिटिश सम्राज्ञी एलिझाबेथ राणीच्या राज्यारोहणाचा योग. आपल्या प्रवासाकरितां कृष्णाजीपंतांना घेण्याचें श्रीमंत बापूसाहेबांनीं ठरविलें. कोणत्याही प्रवासास जातांना त्यांना बरोबर घ्यावयाचें या शिरस्त्याप्रमाणें कृष्णाजीपंतांना तशी सूचना दिली. ‘इंग्रजी भाषेचें मोडकें तोडकें ज्ञान असलेल्या मजसारख्या माणसाचें इंग्रजी राज्यांत जमायचें तरी कसें’ असा प्रश्न कृष्णाजीपंतांच्यापुढें उभा राहिला. असें जरी असलें तरी अंतःकरणांतील कलावंताचा कप्पा नानाविध विचारांनीं हेलकावूं लागला. परदेशांतील चित्रकला, शिल्पकला प्रत्यक्ष पाहावयास मिळेल निसर्गरम्य

देखाव्यांचें आलोचन करतां येईल अशा विचारांनीं — सुखद विचारांनीं — त्यांचें हृदय गदगदूं लागलें. मग कोठली इंग्रजी भाषा नि ती अवगत नसल्यामुळें आलेलें मनावरचें दडपण? ठरलें, कृष्णाजीपंत विलायतेला जाण्याचें ठरलें.

**निळ्या वातावरणांत —**

२२-५-५२ रोजीं B. O. A. C. कंपनीच्या कॉमेट जातीच्या विमानानें सांताक्रूझ विमानतळ सोडलें. मातोश्री लिलावतीदेवी, श्रीमंत बापूसाहेब नि कृष्णाजीपंत याच विमानांत होते. ताशीं ५५० मैलाच्या वेगानें हें विमान धांवत होतें नि इकडे कृष्णाजीपंतांचे विचार दुप्पट वेगानें तरंगत होते. विमानांत बसण्याचा पहिलाच प्रसंग. खालीं पाहावें तो निळें निळें पाणी आणि वर नीलवर्णीय आकाश. काळसर ढगांच्या विस्तीर्ण गालीच्यांतून विमान जात होतें — विचारतंद्री चालूंच होती तोंच कराची विमानतळ आला.

सुमारें अर्ध्या तासाच्या मुक्कामानंतर पुन्हां विमान सुरूं झालें. विमानांत टेबलावरील पाणी डचमळत नव्हतें तरी मानससरोवरांतील हेलकावे अजून विरलेले नव्हते. बेहरुटहून रोमला जसें विमान आलें तसें त्यांना बरें वाटलें. आरामशीर झोंप मिळाल्यामुळें मन शांत झालें कीं, कलाकृतीमध्यें अग्रगण्य असलेल्या रोमच्या दर्शनानें त्यांना समाधान वाटलें, हें ठरविणें जरी कठीण असलें तरी कलावंताचें हृदय कलाकौशल्याचें आगर असलेल्या रोम दर्शनानें तृप्त झालें तर त्यांत नवल कसलें?

**रोमचें शिल्प सौंदर्य —**

शहराच्या चौकाचौकांतून थुइं थुइं उडणारीं कारंजीं आणि ठायीं ठायीं खडे असलेले अप्रतिम पुतळे, डोळ्याचें पारणें फिटावें असें इमारतीचें नक्षीकाम, उत्कृष्ट शिल्पकला—मी मी म्हणणाऱ्या कलावंताचा अहंकार सहज गळून जाईल असें रोममधील कलाकौशल्याचें सौंदर्य — पाहून कोणाला आनंद होणार नाहीं?

तेथील शिल्पकला बोलकी आहे, जिवंत आहे. शिल्पकला पाहात असतांना पुतळे बोलत असल्याचा भास होतो. करुणा, शांतता, भीति, रौद्र, वीरता इत्यादि भाव स्पष्टपणें प्रतीत होत असतांना कलेचें कौतुक करावयाचें कीं ज्या शिल्पकारांनीं आपला जीव ओतून ह्या कलावस्तु निर्माण केल्या त्यांचें अभिनंदन करावयाचें हा प्रश्न पडतो. प्रत्येक पुतळ्याच्या अवयवांत नि स्नायूंत जो नैसर्गिक जोम आणला गेलेला आहे तो पाहून कृष्णाजीपंतांचें मन चकित होऊन गेलें.

दोन महायुद्धें झालीं—विध्वंसन तर कमालीचें झालें; अशा परिस्थितींत निरनिराळ्या कलावस्तूंचें आपल्या प्राणापलीकडे जतन करून ठेवण्यांत रोमवासियांनीं जी कलाप्रीति दाखविली ती धन्य होय. धन्य ती कला नि प्राणापलीकडे त्याची निगा राखणारे धन्य ते रोमवासीय. आणि म्हणूनच कराल कालाच्या दाढेंतून वांचण्याचें सामर्थ्य या शिल्पकृतींना, कलावस्तूंना लाभलें. पांचसहा दिवसांच्या रोमवास्तव्यानंतर २८-५-५३ रोजीं सर्वजण युरोपांतील वा जगांतील 'फॅशनचें घर,' सौंदर्याचें माहेर नि सुखचैनीचें आगर – अशा ख्यातनाम पॅरीस शहरांत आले.

**पॅरीसचा थाटमाट –**

बादशाही थाटांत राहण्याची तऱ्हा, त्यामुळें जीवनमान अत्यंत महाग. सुंदर इमारती, सौंदर्यप्रसाधनांनीं भारावलेल्या लावण्यवती – सगळीकडे फॅशनच फॅशन. सिमेंटचे रस्ते, दुतर्फा ऑलिव्हचीं झाडें – पॅरिस शहर प्रसन्न वाटलें. व्हर्साय शहर पाहिलें. तेथील नेपोलियनच्या राजवाड्यास भेट दिली. वाड्याच्या भिंतीवरील उत्तम पेंटिंग्ज, जुनें फर्निचर, मंत्रिमंडळाचीं सभागृहें हें सर्व पाहून मन प्रसन्न होऊन गेलें. येन नदीच्या कांठावरील सन १८८९ सालीं बांधलेलें एफील टॉवर पाहिलें. आकाशाला कोपरखळी देणारी लोखंडाची ही कलाकृति पाहून मन आश्चर्यचकित झालें.

१-६-५३ रोजीं पॅरीस सोडून लंडनचा मार्ग धरला.

★ ★

## राणीचें राज्यारोहण—

२–६–५३ हा दिवस इग्लंडच्या इतिहासांत संस्मरणीय म्हणून गणला जाईल. दुसऱ्या एलीझाबेथ राणीचा राज्याभिषेक समारंभाचा हा दिवस. जगांतील सर्व राष्ट्रांना या समारंभाचें आमंत्रण देण्यांत आलें होतें. लोकशाहीचीं मूल्यें सांभाळूनहि राजघराण्यांचें इभ्रतीनें संरक्षण करून त्याचे सर्व सुखसोहाळे विधीपूर्वक आणि इतमामानें पार पाडण्यांत इंग्रज लोकांची ख्याति आहे.

निरनिराळ्या देशांतील लक्षावधी लोक या समारंभाकरितां जमले होते. त्यामुळें लंडन शहराला एकाद्या मोठ्या यात्रेचें स्वरूप आलें होतें. समारंभाचा उत्साह सर्व शहरांत ओतप्रोत भरलेला होता. उत्साह-सागराला राणीचा मुखचंद्रमा पाहाण्यासाठीं अमर्याद भरती आली होती. लंडननगर राणीचें हास्यवदनांनीं स्वागत करण्यासाठीं सर्वतोपरी सुसज्ज होतें.

अविस्मरणीय असा हा राज्यारोहण समारंभ फारच क्वचित् पाहावयास मिळतो. कोणत्याहि देशांत राजघराण्याचा इतका मान इतक्या अंतःकरणपूर्वक राखला जात नाहीं. असा हा अपूर्व समारंभ पाहण्याचें भाग्य कृष्णाजीपंतांना लाभलें. दृष्टि धन्य झाली.

एक हजार वर्षांपेक्षांहि जास्त काल आयुष्य लाभलेल्या वेस्ट मिनिस्टर ॲबेचें निरीक्षण केलें. बकिंगहॅम पॅलेस पाहिला. इंग्लीश लोक नव्या युगाच्या सुधारणा जरी तत्काळ आत्मसात् करीत असले तरी जुन्या मतांचाहि पगडा त्यांचे मनावर बसलेला आहे हें दिसून येतें. येथील म्युझियम पाहाण्यासारखा आहे.

**मेणाचीं माणसें –**

येथें असलेल्या मेणांच्या पुतळ्यांचें प्रदर्शन कृष्णाजीपंतांनीं पाहिलें. इतिहासप्रसिद्ध राजे, राण्या, पंतप्रधान, गव्हर्नर, लेखक इत्यादि प्रसिद्ध व्यक्तींचे मेणाचे हुबेहुब पुतळे तयार केलेले नि त्यांचा आकारहि माणसां-एवढा ठेवलेला आणि योग्य ते कपडे त्यावर चढविलेले. त्या त्या व्यक्ती आपल्या समोर उभ्या असल्याचा भास होई.

म्युझियमच्या तळघरांत पूर्वीं मनुष्याला शिक्षा कशी देत याची कल्पना देणारे पुतळे ठेवलेले आहेत. त्या शिक्षांचे प्रकार नि पुतळ्यांच्या मुद्रे-वरील भयानक हावभाव पाहून अंगावर भीतीनें कांटा उभा राहतो. इतका तिथें सत्याचा आभास निर्माण होतो. प्रत्यक्ष यमपुरीचें दर्शन घडविणारें हें तळघर आहे.

**हॉलंड–पाण्याचे रस्ते–**

१५-६-५३ रोजीं जगांतील मोठ्या विमानतळावर–आमस्टरडॅमला (हॉलंड)–कृष्णाजीपंत उतरले. हिऱ्याचा कारखाना पाहिला. मशीनच्या साहाय्यानें हिरे कसे कटींग करतात, त्यांवर पैलू कसे पाडले जातात, त्याचे लहानमोठे प्रकार कसे विभागले जातात इत्यादि कामें समक्ष पाहावयास मिळालीं.

हॉलंड हा समुद्रसपाटी खालील प्रदेश. सर्वत्र पाण्याचे कालवे दृष्टीस पडतात. येथें कालव्यांचा रस्त्याप्रमाणें उपयोग करतात. दोन्ही बाजूला घरें, फूटपाथ, रस्ते नि मध्यभागीं कालवा अशी रचना आहे शहरांची.

या ठिकाणीं फुलांचा प्रेक्षणीय बाजार भरतो. आल्शमीर येथें रोज कॅनॉलमधून स्टीम लॅांचनें फुलें येतात. नाना प्रकारचीं, नाना रंगांचीं फुलें रंगसंगती जुळवून मोठ्या चार चाकी गाड्यावर व्यवस्थित मांडतात. या बाजारासाठीं मोठा हॉल असतो. त्यांत थिएटरसारख्या उतार पायऱ्या

असून त्यावर व्यापारी बसतात. तेथें एक मोठा घड्याळासारखा नंबर नि आंकडे दाखविणारा फलक असतो. लिलाव बोलतांना व्यापारी आपल्या खुर्चीवर असलेल्या नंबरावरून विजेचें बटन दाबतो नि खुर्ची, नंबर आणि दराचा आंकडा फलकावर येतो; असा न बोलतां ह्या लिलावाचा व्यवहार होतो.

हेग ही हॉलंडची राजधानी. 'पीस पॅलेस' म्हणून महत्त्वाची इमारत आहे. हा भव्य असा पॅलेस असून सर्व इमारत दगडी आहे. विशेष नवलाची गोष्ट नि कृष्णाजीपंतांना जी चटकन् जाणवली ती म्हणजे या इमारतींत असलेला महात्मा गांधींचा संगमरवरी अर्ध पुतळा.

वैशिष्ठ्यपूर्ण असा एक म्युझियम येथें आहे. त्याचें वैशिष्ठ्य म्हणजे तिथला एक टॉवर. याच्या वरच्या टोंकावर आल्यावर एक सुंदर शहराचा देखावा दिसतो. त्यांत समुद्र, बोटी, घरें झाडें वगैरे दिसतात. हा देखावा पाहातांना आपण एक सत्य दृश्य पाहात आहोंत असें वाटतें, परंतु तो आभास असतो. तें एक पेंटिंग असतें. सुमारें पन्नास फूट अंतरावर साधारणपणें पांच हजार फूट लांबीचें आणि पन्नास फूट रुंदीचें तें एक चित्र असतें. असें हें भव्य पेंटिंग पाहून कृष्णाजीपंत चकितच झाले.

**बर्फाच्या देशांत -**

२५-६-५३ रोजीं स्वित्सर्लंडमध्यें सर्वजण आले. गगनचुंबी बर्फाचे डोंगर, मोठमोठीं सरोवरें, सुपीक जमीन, फळाफुलांनीं बहरलेला असा हा देश.

इंटरलेकनचें फुलांचें घड्याळ सर्वांचें लक्ष वेधून घेतें. जमिनीवर फुलझाडें लावून त्यामध्यें आंकडे व काटे बनविलेले आहेत.

जंगफरुला आइस पॅलेस मनोहर आहे. बर्फाच्या गुहा, उन्हांत चमकणाऱ्या बर्फाचे रमणीय देखावे, बर्फ वितळून ओहोळांतून निर्माण होणारे लहानमोठे धबधबे – नजरा खिळून टाकतील असे हे देखावे

ठायीं ठायीं आहेत. जिनेव्हाचा ३०० फूट उंच उडणारा कारंजा दृष्टि दिपवून टाकतो.

राजधानी असलेल्या बर्न शहरांत एका मोठ्या टॉवरवर वीस फूट व्यासाचें एक भलें मोठें घड्याळ आहे. तासांचे आवाज होतांना घंटा वाजविणारीं चित्रें इकडून तिकडे फिरतांना दिसतात.

११-७-५३ रोजीं पोर्तुगालला भेट देण्याची संधि कृष्णाजीपंतांना लाभली. हिंदुस्थानचा एक भाग व कारेकरांची दैवतभूमि गोवा, ज्यांनीं आपल्या कबजांत लोकांची इच्छा नसतांनाहि ठेवली त्या पोर्तुगीजांच्या देशास कृष्णाजीपंत प्रवासी म्हणून आले होते. दीडशें वर्षांपूर्वींचा जुना राजवाडा पाहातांना या राजवाड्यांतून जी कांहीं 'सैतानी फर्मानें' निघालीं नि जेणेंकरून आपल्या पूर्वजांना त्रास झाला याची याद कृष्णाजीपंतांना आली.

सिंतरा येथील नॅशनल पॅलेस तेथील शिल्पकृतीमुळें प्रेक्षणीय आहे. शिल्पकलेचे उत्तम नमुने तेथें पाहावयास मिळाले.

'कॅरेज म्युझियम'नें तर बरीच माहिती पुरविली. सर्व देशांतील राजांच्या दरबारी थाटांच्या गाड्या येथें ठेवलेल्या आहेत. गाड्यावरील नक्षीकाम, जरीचें काम, घोड्याचें सामान इत्यादि जुनीं कामें पाहाण्या-सारखीं आहेत.

माद्रिद, जिब्राल्टर असा प्रवास करीत १३-७-५३ रोजीं इटलींतील जिनोआ शहरीं आले. येथील स्मशान भूमि प्रसिद्ध आहे. हजारो थडगीं, लहानमोठे पुतळे म्हणजे मूर्तिमंत शिल्पकलाच. पुतळ्यांची कारागिरी इतकी उत्कृष्ट आहे कीं माणसाचे दोन डोळे या सौंदर्याचें आकलन करण्यास अपुरे पडतात. ही स्मशानभूमि म्हणजे खरोखर शिल्पकलेचें नंदनवन होय.

३०-७-५३ रोजीं एशिया बोटीनें परतीचा प्रवास सुरूं झाला. नेपल्स, पोर्टसैद—सुवेज कॅनालमधून—एडन, कराची असा प्रवास करीत २॥-२॥ महिन्यानंतर १३-८-५३ रोजीं कृष्णाजीपंत मुंबईंत दाखल झाले.

कृष्णाजीपंतांची ही विलायतवारी अपेक्षेपेक्षांहि यशस्वी झाली. काका मांसाहार करीत नाहीं, दारु पाहिली म्हणजे शिसारी येते, अशा 'काकां'चे युरोपांत जमायचें कसें याची अनेकांना चिंता पडली होती; पण जेव्हां 'आपल्या नेहमीच्याच सुहास्य मुद्रेनें कृष्णाजीपंत—काका—बंदरांतून बाहेर आले तेव्हां सर्वांना हायसें वाटलें. अनेकांनीं त्यांच्या निष्ठेचें कौतुक केलें.

श्रीमंत बापूसाहेब जमखिंडीचे राजेसाहेब आणि मातोश्री लीलावतीदेवी यांच्या समवेत कृष्णाजीपंतांचा हा परदेशचा प्रवास घडून आला. इंग्रजीचें ज्ञान नव्हतें तरी श्रीमंत बापूसाहेब यांनीं कृष्णाजींपंतांना परदेशांतील चालीरीतींची व शिष्टाचाराची यथायोग्य माहिती दिली. मातोश्री लीलावतीदेवी या शाकाहारी असल्यानें कृष्णाजीपंतांचा शाकाहारी नियम अभंग राहिला. सर्वांचा प्रवास अत्यंत खेळीमेळीचा आणि मोठ्या आनंदाचा झाला.

★ ★

कै. सौ. सत्यभामाबाई कृष्णाजी कारेकर



कारेकर कुटुंब



उभे:- १) भालचंद्रपंत २) शांतारामबापू ३) अरविंद ४) गोविंदराव
बसलेले:-१ रांक] १) विजयकुमार २) सौ. शशिकला व विवेक ३) सौ. सुलभा
४) कृष्णाजीपंत ५) सौ. अंजली ६) सौ. कुमुदिनी व रेखा
७) रामनाथ.
बसलेले:-२ रांक] १) दिलीप २) नीना ३) कमलाकर ४) सुभाष ५) शैला
६) सुरेश.

# मजेखातर उत्तरेकडे—

कृष्णाजीपंतांना प्रवासाची अत्यंत आवड नि त्यांची वाणी मोठी मिष्ठास. साहजिकच प्रवासास जातांना 'कारेकरशेठ' बरोबर असायचेच असा जमखिंडीकर कुटुंबांत तरी संकेत होऊन बसला होता. गोव्याची सफर काय, विलायतची वारी काय किंवा भाक्रा धरण पाहण्याची सहल काय जमखिंडीकरांच्याबरोबर कृष्णाजीपंत असावयाचेच.

श्रीमंत लैलादेवी, त्यांचे बंधूराज दिलीप किबे यांनीं जेव्हां उत्तर हिंदुस्थानची सफर करण्याचें ठरविलें त्या वेळीं कृष्णाजीपंतांनाहि बरोबर घ्यावयाचें असें अगोदरच ठरलेलें होतें.

३१-१०-५५ रोजीं सर्व मंडळी खास मोटारीनें प्रवासास निघालीं. देवास – पाचोरा – शिवपुरी असा प्रवास करीत ग्वाल्हेरास जाऊन तेथील 'फोर्ट' पाहिला. तटबंदीच्या वर असलेल्या दरवाजाकडे जाणारा चढाव चढतां चढतां दोन्ही बाजूच्या खडकावरील सुंदर नि भव्य अशा बुद्धाच्या मूर्ती कोरलेल्या पाहावयास मिळाल्या. सिंधीया स्कूल पाहिलें. त्यानंतर 'सासु-सुना' या नांवाचें जुनें पण सुंदर मंदिर पाहून सर्वजण आग्रा-मार्गास लागले.

आग्रा पाहाण्यास सर्वजण उत्सुक होते.. कृष्णाजीपंतांची फार दिवसाची मनीषा पूर्ण होणार होती. कलाकृतीचा कौस्तुभ असा जो ताजमहाल तो त्यांना पाहावयाचा होता, अगदीं डोळे भरून पाहावयाचा होता. ताजमहाल दिवसा पाहिला व चांदण्या रात्रीं जाऊनहि त्याचें अप्रतीम सौंदर्य अवलोकन केलें. 'पाहातां पाहातां पाहावाची वाटे' असें झालें कृष्णाजीपंतांना. त्यांचा पायच तेथून निघेना.

आग्र्यानंतर दिल्ली, तेथून अंबाला असा प्रवास करीत ४-११-५५ रोजीं भाक्रा धरणाचें अवलोकन करण्याकरितां सर्वजण तेथें पोहोचले. ६०० फूट रुंद नि ९०० फूट उंच एवढी मोठी भित तयार करण्याचें काम त्या वेळीं चालू होतें. मशीनच्या साहाय्यानें चाललेली प्रचंड कामगिरी पाहून डोळे दिपून गेले.

गंगवाल पॉवरहाऊस, पंजाबची नवी वसवलेली नि आधुनिक पद्धतीनें रचना केलेली राजधानी चंदीगड पाहून सिमल्याहून सर्व मंडळी दिल्लीस आली. दिल्लीतील सर्व प्रेक्षणीय स्थळें – लाल किल्ला, दिवाण-इ-आम, रंगमहाल, दिवाण-इ-खास, म्युझियम, जुम्मा मशिद, राजघाट, व्हाइस-रिगल लॉज, सेक्रेटरिएट, संसद सभागृह, इंडीया-गेट--पाहून त्या सुमारास भरलेलें औद्योगिक प्रदर्शन पाहून घेतलें. नंतर फत्तेपूर-सिक्री पाहिली.

नंतर पुन्हा आग्रा-ग्वाल्हेर असा प्रवास करीत सर्व मंडळी इंदोरला आली. तेथें दोन दिवस मुक्काम करून कृष्णाजीपंत कोल्हापुरास परतले.

ही छोटीशी पण लांबच्या प्रवासाची सहल अत्यंत मजेची झाली. श्री. दिलीप किबे, त्यांचे मित्र श्री. बाळ खांडेकर, श्रीमंत लैलादेवी नि कृष्णाजीपंत यांचा हा प्रवास गप्पागोष्टी, हास्यविनोद यांनीं परिपूर्ण असा होऊन अगदीं उत्साहाचा नि मजेचा झाला. अर्थात् याला कारण 'कारेकर, शेट' यांची रसाळ नि मिष्किल वाणी हें काय सांगायला हवें !

★ ★

# गृहस्थी काका—

'प्रपंच करावा नेटका' असें म्हणतात आणि 'नेटका' संसार करण्यांतच मनुष्य जन्माचें सार्थक आहे.

कृष्णाजीपंतांच्या शुक्रवार पेठेंतील (कोल्हापूर) तिमजली घरांत प्रवेश केला कीं संसाराच्या व्यापाची कल्पना येते. मुलाबाळांनीं भरलेलें घर पाहून मन प्रसन्न होऊन जातें. सर्वांचे चेहरे फुललेले, कोणी निराश नाहीं, दुःखी नाहीं– सर्व कांहीं मजेंत, आनंदांत.

कृष्णाजीपंतांची तपश्चर्याच एवढी मोठी कीं वर उल्लेखिलेलें गोड फळ त्यांस यावें. वयाच्या १४ व्या वर्षी लग्न होऊन कृष्णाजीपंत संसारी झाले. वडिलांच्या डोळ्यादेखत 'कृष्णाचे' चार हात व्हावेत म्हणून वडील बंधूनीं–दादांनीं त्यांच्या लग्नाचा बेत उरकून टाकला.

१९१३ ते आजतागायत असा त्यांच्या संसारी जीवनाचा चित्रपट उभा केला कीं एक प्रकारचें समाधान लाभतें. त्यांच्या जीवनांत संकटें आलीं नाहींत असें नाहीं, शारीरिक आजार नाहींत असेंहि नाहीं, (कृष्णाजीपंत स्वतः मलेरियानें कित्येक दिवस आजारी होते. हवा पालटण्याकरितां त्यांना मिरजेसहि ठेवण्यांत आलें होतें) पण दगदग नाहीं, गडबड नाहीं. सारें कसें वक्तशीर. शांतपणें संसारशकट हांकणें नि तो यशस्वी करून दाखविणें यांतच कृष्णाजीपंतांचें खरें कौशल्य आहे. सोन्याचांदीच्या मूर्ती त्यांनीं उत्कृष्टपणें घडविल्या. पण 'संसार'रूपी मूर्तीसुद्धां यशस्वी घडविली, रेखीव केली !

१९३६ पर्यंत एकत्र कुटुंब असल्यामुळें त्यांचेवर विशेष अशी जबाबदारी नव्हती. संसाराची सर्व सूत्रें दादाच चालवीत होते. अर्थात् विभक्तीकरण झाल्यानंतरहि दादांचा सल्ला प्रमाणभूत मानला जाई व तो अगत्यानें घेतलाहि जाई. बंधुप्रीतीचें हें उदाहरण उल्लेखनीय म्हणावें लागेल.

कृष्णाजीपंत यांच्या पत्नी सत्यभामाबाई यांचें माहेर पन्हाळगड येथील जामसांडेकर कुटुंबांत होतें. पूर्वीच्या काळांस अनुसरून त्यांचें शिक्षण अगदीं नाममात्र असलें तरी- गृहकृत्यदक्षता, व्यवहार-कुशलता, प्रेमळपणा आणि मनाचा धीटपणा यामुळें कृष्णाजी पंतांचा संसार अत्यंत सुखा-समाधानाचा चाललेला होता.

१९१३ ते १९४५ या कालखंडांत त्यांच्या पत्नीनें ममत्वानें, प्रेमानें, आपुलकीनें साथ दिली. पुरुषाचें कर्तृत्व स्त्रीच्या- सहकारितेवर जास्त अवलंबून असतें आणि कृष्णाजीपंतांच्या यशस्वी संसारात त्यांच्या पत्नीचा वांटा निश्चितपणें मोठा आहे. आदर्श गृहिणी म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. काकींच्या प्रेमळ स्वभावाची आठवण संबधितांना अजूनही होते.

कृष्णाजीपंतांना सहा मुलें व दोन मुली. मुलींचीं लग्नें झालेलीं असून आपापल्या संसारांत त्या रममाण आहेत. कर्तबगार पित्याचे पुत्र कर्तबगार निपजणें यालाहि भाग्य लागतें. बापानें बसविलेली घडी मुलांनीं नीट संभाळली तर ठीक. या दृष्टीनें कृष्णाजीपंतांचा कोणीहि हेवा करावा असें त्यांच्या मुलांचें वागणें आहे.

मुलें मोठीं झालीं, संसारीं झालीं तरी 'काकांच्या' नजरेला नजर नाहीं. सर्वांकडेच ममत्वानें पाहाणारी कलावंताची नजर, आपुलकीचा जिव्हाळा असलेलें कलावंताचें कोमल हृदय, स्नेहार्द वागणूक यामुळें कलहाचा प्रसंगच नाहीं.

त्यांचे थोरले चिरंजीव भालचंद्रपंत उत्कृष्ट चित्रकार आहेत. फोटो-ग्राफींत त्यांचा हातखंडा आहे. चित्रकलेचा गव्हर्मेंट डिप्लोमा (G.D Art) त्यांनीं मिळविला आहे. वडिलांच्या कीर्तींत भर घालण्याची कामगिरी ते निश्चितपणें पार पाडतील.

भालचंद्रपंत यांची पत्नी म्हणजे पन्हाळा येथील श्री. रामचंद्रपंत जामसांडेकर यांची कन्या होय. म्हणजे सौ. शशिकला ही कृष्णाजीपंतांची

थोरली सून आहे. नव्या घरांत पाऊल ठेवल्यावर अवघ्या चार वर्षांनीं सौ. सत्यभामाबाईनीं–म्हणजे सौ. शशिकलेच्या सासूबाईनीं–इहलोकीची यात्रा संपविली. आणि त्यामुळें संसाराचा सर्व भार तिच्यावरच पडला. परंतु कृष्णाजीपंतांच्या मार्गदर्शनाखालीं सौ. शशिकलेनें मोठ्या कुशलतेनें संसाररथ योग्य मार्गानें चालवून कृष्णाजीपंतांना सुखी केलें.

त्यांचे दुसरे चिरंजीव गोविंदराव यांना त्यांनीं सराफी व्यवसायांत हाताखालीं घेतलें आहे. श्री. गोविंदराव यांची पत्नी सौ. कुमुदिनी ही तासगांव येथील श्री. हरीभाऊ खेडेकर यांची मुलगी. तिचा स्वभाव अतिशय गरीब असून थोरली जाऊ सौ. शशीकला हिचेबरोबर ती बरोबरीनें हातभार लावीत असते.

कर्तबगार पित्याच्या वैभवांत, किर्तींत भर घालण्याची कामगिरी इतर पुत्र करीत आहेतच पण शांतारामबापूंचा वाटा त्यांत मोठा. जी. डी. आर्टस् ही पदवी चित्रकलेंतील प्रवीणता दर्शविते, बी. ए. ही पदवी शालेय शिक्षणाचा दर्जा दाखवते नि आर्किटेक्चरची लंडन विश्वविद्यालयाची पदवी हुशारीचें मोजमाप करतें. चार वर्षें परदेशांत त्यांनीं काढलीं. ज्या Asia बोटीनें कृष्णाजीपंत विलायतेहून परत आले त्याच बोटींतून शांतारामबापू शिक्षणाकरितां परदेशीं गेले. याला म्हणतात योगायोग. लंडनला आदर्श विद्यार्थी म्हणून ते ओळखिले जात. सध्यां ते बेंगलोरला नामांकित फर्ममध्यें नोकरीस आहेत. स्थापत्यशास्त्राचें शिक्षण घेतलेली मंडळी भारतांत कमी आहेत. अशा निवडक लोकांत बापूसाहेब आहेत ही गोष्ट काय कमी महत्त्वाची? शांतारामबापू लहानपणापासूनच सुस्वभावी, अभ्यासांत दक्ष, आज्ञाधारक. दादा म्हणत असत बापू म्हणजे ‘सोन्याचा तुकडा’ आहे.

श्री. शांतारामबापू यांची पत्नी सौ. कुसूम ही बडोदे येथील श्री. वासुदेवराव एकबोटे सराफ, यांची कन्या आहे. तिचें शिक्षण मॅट्रिक-पर्यंत झालेलें असून ती सुगृहिणी आहे.

त्यांचे चौथे चिरंजीव श्री. रामनाथ हे सुवर्णकार धंदा करीत असून सराफींतही साहाय्य करतात. त्यांची पत्नी सौ. रंजना ही कोल्हापुरांतील श्री. विश्वनाथ कृष्णाजी जामसांडेकर यांची मुलगी होय.

दुसरे दोघे विजय व अरविंद कॉलेज शिक्षण घेत आहेत. कृष्णाजी-पंतांची एक कन्या सौ. शकुंतला ऊर्फ सुलभा हिचा विवाह सुमारें सहा-वर्षांपूर्वी तासगांवचे श्री. खेडेकर यांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. दत्तोपंत यांचेशीं झाला. श्री. दत्तोपंत मामलेदार कचेरींत नोकरी करतात.

दुसरी कन्या सौ. कुसूम उर्फ अंजली हिचा विवाह मुंबईतील डिलाईल रोड येथें राहणारे श्री. एकनाथपंत मालडीकर यांचेशीं दोन वर्षांपूर्वी झाला. श्री. एकनाथपंत सुवर्णकाराचें काम करतात.

घरांत आशाधारक नातवंडांचें गोकुळ रंगलेलें आहे. त्यांचें शिक्षण व्यवस्थित चाललेलें आहे. या भरल्या संसारावर कृष्णाजीपंत आधारवडा-सारखें छाया धरून आहेत. सर्व समाधानानें चाललें आहे.

★ ★

## आयुष्याची सांगता—

कृष्णाजीपंतांचें हें जीवन न्याहाळल्यानंतर कोणी म्हणेल यांत कृष्णाजीपंतांचें विशेष तें काय? राजाश्रय होता, पाठबळ होतें, संधि मिळाली म्हणून आले पुढें. यांत त्यांचें विशेष काय? ज्यांचें साहाय्य मिळालें, ज्यांचे आशिर्वाद लाभले, ज्यांनीं संधि दिली– त्या सर्वांचा आदरपूर्वक उल्लेख करूनहि असें म्हणावें लागेल कीं योग्य त्या माणसास या गोष्टी साहाय्यभूत झाल्या म्हणूनच त्यांचें महत्त्व. एकाद्या येऱ्यागबाळ्यास या गोष्टी उपलब्ध होऊनहि उपयोग झाला असता काय?

व्यक्ती म्हणून जेव्हां कृष्णाजीपंतांच्या स्वभाव वैशिष्ट्याचें विश्लेषण करूं लागतो. तेव्हां त्यांच्या व्यक्तीत्वाचे अनेक पैलू पाहावयास मिळतात.

कृष्णाजीपंत सरळ–साधे गृहस्थ. कोणाशीं वैर नाहीं, कोणास दुखवावयाचें नाहीं, हें त्यांचें धोरण; स्वभाव मोठा चतुर, विनयशील व आनंदी. चेहरा दुःखीकष्टी कधीं दिसावयाचा नाहीं. सदैव चेहऱ्यावर हास्य. कोणीहि येवो, हंसत मुखानें प्रथम त्याचें स्वागत व्हावयाचें, आपुलकीनें त्याला आपलासा करावयाचा.

सर्वांचा स्नेह संपादन करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. विशेषतः संस्थानिक व सरदार यांचा संतोष कसा संपादन करावा याचें ज्ञान त्यांना पूर्ण अवगत आहे. संस्थानिकाशीं अकृत्रिम स्नेह संपादन करणें व त्यांचा विश्वास संपादून घरोबा प्रस्थापित करणें हें चातुर्याचें लक्षण नव्हे काय?

कलावंत बहुतेक लहरी व व्यसनी असतात, पण कृष्णाजीपंत या नियमास असणाऱ्या असामान्य अपवादांत पडणारे एक निर्मळ सद्‌गृहस्थ आहेत.

कृष्णाजीपंत कोठेंहि गेले तरी त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याचा परिमल दबला जात नाहीं. वातावरणांत एकदम प्रसन्नता येते; सौजन्य दरवळूं लागतें.

आनंदी वृत्ति हा त्यांचा स्थायीभाव. समाधानी वृत्तीनें राहाणें, ईश्वरावर पूर्ण निष्ठा ठेवून मार्गक्रमणा करणें हें त्यांचें धोरण. परदेशीं जाऊन आलेले असले तरी कृष्णाजीपंत पूर्ण शाकाहारी आहेत. त्यांना कोणतेंच व्यसन नाहीं एकपत्नीव्रत त्यांनीं चांगलेंच पाळलें आहे. या नियमित राहाणीमुळें त्यांची प्रकृति या वयांतहि उत्तम आहे.

कृष्णाजीपंतांचें भावी जीवन सुखासमाधानाचें जावो व त्यांची शताब्दि साजरी करण्याचा योग आम्हां चाहत्यांना व त्यांच्या कुटुंबियांना लाभो ही जगदंबाचरणीं प्रार्थना.

★ ★

# आशिर्वादासाठीं—

काकाजी,

तुमची पहिली सून म्हणून तुमच्या घराच्या उंबरठ्यांत पाऊल टाकण्याचं भाग्य मला लाभलं. सासूबाईच्या महाप्रयाणानंतर तुम्हीं सासूच्या अंतःकरणांतील आईच्या हृदयानें माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला. त्याचें ऋण फेडण्यासाठीं मला अनेक जन्म घ्यावे लागतील. आज मी तुमच्या एकसष्ठाव्या वाढदिवशीं तुम्हांला अत्यादरानें नमस्कार करून आशीर्वाद मागते आहें. परमेश्वराचें अधिष्ठान अंतःकरणांत असतें. तुम्ही मला त्याच अंतःकरणानें आशीर्वाद द्यावा अशी मी नम्र विनंति करतें. तुमच्या घरांतील देवाजवळ नंदादीपाची ज्योत पाजळण्याचें अहोभाग्य मला मिळालें आणि मी धन्य झालें.

काकाजी, त्या नंदादीपाच्या स्निग्ध आणि स्नेहल प्रकाशांत आमचा जीवन प्रवास सुखकर व्हावा, तुमचा मंगल आशीर्वाद आमच्या पाठीशीं सदैव उभा असावा अशी इच्छा करणारी,

तुमची सून

**सौ. शशिकला**

# साठींतील आमचे काका--

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी आमच्या काकांची. इंग्रजीचा गंध नाहीं. मराठी शिक्षण बेताचेंच. पण लहानपणापासून चित्रकलेची आवड. त्यांतच दिवसेंदिवस प्रगति होत गेली. वयाच्या विसाव्या वर्षीं कलाप्रेमी श्रीमंत बाळासाहेब पंतअमात्य जहागिरदार बावडा यांचा आश्रय मिळाल्यानें चित्रकलेच्या उच्च शिक्षणासाठीं मुंबईस प्रयाण. त्याच वेळीं काकांनीं मूर्ति बनविणें, एनग्रेव्हिंग, प्लेटिंगचाहि अभ्यास केला. प्रभू रामचंद्र हें श्रीमंत जहागिरदारांचें कुलदैवत. चंदनाच्या प्रभु रामचंद्राच्या मूर्ति करून काकांनीं श्रीमंतांची वाहवा मिळविली व या वेळीं कोल्हापूर येथें भरलेल्या दैवज्ञ समाज परिषदेमध्यें पाहण्यास ठेवल्या. सर्वांनींच कलाकाराची प्रशंसा केली व या वेळेपासूनच काका-मूर्तिकार काका-म्हणून ओळखले जाऊं लागले.

कोणासहि गुरु न करतां बावडा येथेंच राहून काकांनीं फोटोग्राफीचें शिक्षण घेतलें व त्यांत प्राविण्य मिळविलें. वडिलार्जित धंदा सोनार कामाचा. त्याच कामावर श्रीमंत पंतअमात्य यांनीं १५ रु. पगारावर खासगी खात्यांत नेमणूक केली. सोनार कामाबरोबरच हस्तिदंती मूर्तींचीं कामें श्रीमंतांनीं करवून घेतलीं. याच कालांत पुणें येथील चित्रशाळेमार्फत रायबरेलीचें मूर्तीचें काम आलें. मूर्तिकार म्हणून अभिमान अगर गर्व न मानतां गरीबाचें अगर श्रीमंताचें सोनार काम तितकेंच आपुलकीनें, नेकीनें व सचोटीनें आजहि करीत आहेत. सन १९२८ मध्यें श्रीमंतांचें छत्र नाहीसें झाल्यानें सदर काल काकांना मोठा जिकीरीचा, दगदगीचा व हित-शत्रूंचा त्रास सहन करून बावडा येथेंच काढावा लागला.

सन १९३० सालीं काका कोल्हापुरीं मूर्तिकार म्हणून आले. याच सुमारास हिंदुस्थानचे व्हाईसराय यांचें कोल्हापुरांत आगमन झालें.

अवघ्या आठेचाळीस तासांत हस्तिदंती बस्ट तयार करून देऊन त्यांचेकडून प्रशस्तिपत्रक मिळविलें. आणि या वेळेपासूनच त्यांचे आयुष्यास वेगळीच कलाटणी मिळाली. कोल्हापुरांतील सराफ कट्यांत जम बसूं लागला व पटवर्धन संस्थानिकांचीं कामें येऊं लागलीं व पुन्हां राजाश्रय मिळूं लागला. पण तरीहि काका लोकाश्रयासहि पारखे झाले नाहींत. याच वेळीं काका कोल्हापुरांत स्थाईक बनले. पण त्याच सुमारास त्यांचेवर कौटुंबिक आपत्ति आली—त्यांच्या सुशील आणि प्रेमळ पत्नी निवर्तल्या.

विलायतचे प्रवासाहून आलेनंतर काका हे मूर्तिकार काका राहिले नसून ते आतां जवाहिरे बनले आहेत. हेहि सौदे करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. कांहीं सिनेतारकांचा परिचय झाल्यानें त्यांहि क्षेत्रांत आपल्या धंद्याचा त्यांनीं जम बसविला आहे.

आमचे ‘ साठींतील काका ’ म्हणजे दैवज्ञ समाजांतील एक कलाकार व जवाहिरे कृष्णाजी बळवंत कारेकर हे होत. त्यांच्या या साठाव्या वाढदिवशीं आम्ही त्यांना सुयश चिंतून त्यांची पुढील चाळीशी उत्कर्षित होवो व त्यांचा शंभरावा वाढदिवस साजरा करण्याची संधि त्यांचे स्नेही व त्यांच्या पुत्रांना लाभो व असाच उत्कर्ष होवो अशी त्यांचें कुलदैवत श्री तुळजाभवानीची प्रार्थना करून, आपली रजा घेतों.

पिलोबा ढवळे,

मराठी
अनुक्रम
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०३२९

REFBK-0010321